# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
| --- | --- |

(६)

९४/९५

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- | --- |
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०७/२०१४.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०७ दिनांक २८/०७/२०१४**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शनिवार दि. ०२/०८/२०१४ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. २८/०७/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०७, दि. २८/०७/२०१४ सोबतची विषय पत्रिका
सभा शनिवार दि. ०२/०८/२०१४

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत -- |
| ४७ | दि. ०७/०५/२०१४, दि. ३०/०५/२०१४ व दि. १३/०६/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज - निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| ४८ | मिरारोड येथील आर.एन.ए. ब्रॉडवे व लिबर्टी या संकुलानातील एस.टी.पी. महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेबाबत. |
| ४९ | महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, नगरभवन व स्व. इंदिरा गांधी रुग्णालय या ठिकाणी स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणे कामाच्या निवीदेस मान्यता मिळणेबाबत. |
| ५० | महानगरपालिका वाहने निर्लेखित करण्यासाठी E-Auction लिलावामार्फत आलेल्या बोली रक्कमेस मान्यता मिळणेबाबत.<br>(मा. स्थायी समिती सभा दि. १८/०७/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३३) |
| ५१ | अग्निशमन दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य (उर्वरित) मिळणेबाबत. |
| ५२ | निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ५३ | निवीदांना मंजुरी मिळणेबाबत. (शिक्षण मंडळ)<br>मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व बॅच टायसह पुरवठा करणे.<br>(मा. स्थायी समिती सभा दि. १८/०७/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४१) |
| ५४ | अग्निशमन विभागाकरिता वाहनासह हायड्रोलिक शिडी घेणेबाबत. |
| ५५ | मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- २८/०७/२०१४.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०७, दि. २८/०७/२०१४ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शनिवार दि. ०२/०८/२०१४**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ४७ | दि. ०७/०५/२०१४, दि. ३०/०५/२०१४ व दि. १३/०६/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| [illegible] | ~~उद्यान~~ व ~~वृक्षप्राधिकरण~~ विभागाकरिता वाहनासह हायड्रोलिक शिडी घेणेबाबत. |
| ४९ | मिरारोड येथील आर.एन.ए. ब्रॉडवे व लिबर्टी या संकुलानातील एस.टी.पी. महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणेबाबत. |
| ५० | महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, नगरभवन व स्व. इंदिरा गांधी रुग्णालय या ठिकाणी स्थायी अग्निशमन यंत्रणा बसविणे कामाच्या निवीदेस मान्यता मिळणेबाबत. |
| ५१ | महानगरपालिका वाहने निर्लेखित करण्यासाठी E-Auction लिलावामार्फत आलेल्या बोली रक्कमेस मान्यता मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १८/०७/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३३) |
| ५२ | अग्निशमन दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य (उर्वरित) मिळणेबाबत. |
| ५३ | निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| ५४ | निवीदांना मंजुरी मिळणेबाबत. (शिक्षण मंडळ)<br>मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व बॅच टायसह पुरवठा करणे. (मा. स्थायी समिती सभा दि. १८/०७/२०१८ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ४१) |
| ५५ | मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- २८/०७/२०१४.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा

दि. ०७/०५/२०१४

रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ७/०५/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. ०७/०५/२०१४ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०६/०५/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्री. राजु यशवंत भोईर | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ६. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ७. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| १०. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ११. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १२. | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| २) | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ३) | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ४) | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्याचे हार्दिक स्वागत, सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. सचिव साहेब सभेला सुरूवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा बुधवार दि. ०७/०५/२०१४ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०६/०५/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात नालेसफाई कामी लागणारी आवश्यक यंत्रसामुग्री व संक्शन पंप भाड्याने घेणे कामाच्या निविदांना मंजूरी देणे. आचारसंहिता असल्यामुळे आपल्याला फक्त त्याच विषयावर बोलता येईल

**रोहिदास पाटील :-**

महापालिका क्षेत्रातील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षा करीता पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामी आवश्यक यंत्रसामुग्री तसेच विविध क्षमतेचे सक्शन पंप भाडयाने पुरवठा कामाची ई-टेडरींगद्वारे दि. २८/३/२०१४ पर्यंत निविदा मागविण्यात आली होती. प्रभाग समिती क्र. ०१ ते ०२ करीता मे.एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि. व प्रभाग समिती क्र. ०३ ते ०४ करीता मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी तसेच सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी या कंपनी समवेत यांनी सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**प्रभाग समिती क्र. ०१ व ०२ (जुनी) करीता मे. एम.ई.प्रोजेक्ट प्रा. लि. यांचे प्राप्त दर :-**

| Sr. No. | Type of Machinery, Equipment & Manpower | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|
| 01 | POCLAIN MACHINE - 200 | रु. १,९३०/- प्रती तास |
| 02 | POCLAIN MACHINE WITH BOAT | रु. २,१८२/- प्रती तास |
| 03 | JCB MACHINE | रु. १,०५७/- प्रती तास |

| | | |
|---|---|---|
| 04 | DUMPER | रु. ५,८९७/- प्रती शिफ्ट |
| 05 | TORAS | रु. ८,६३३/- प्रती शिफ्ट |
| 06 | HAYDRA MACHINE | रु. १,०१८/- प्रती तास |
| 07 | CRAINE MACHINE | रु. ४,३६५/- प्रती तास |
| 08 | MAN POWER | रु. ५३५ /- प्रती मजुर प्रती दिवस |

**प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ (जुनी) करीता मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कपंनी यांचे प्राप्त दर :-**

| Sr. No. | Type of Machinery, Equipment & Manpower | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|
| 01 | POCLAIN MACHINE - 200 | रु. १,९३०/- प्रती तास |
| 02 | POCLAIN MACHINE WITH BOAT | रु. २,१८२/- प्रती तास |
| 03 | JCB MACHINE | रु. १,०५७/- प्रती तास |
| 04 | DUMPER | रु ५,८९७/- प्रती शिफ्ट |
| 05 | TORAS | रु. ८,६३३/- प्रती शिफ्ट |
| 06 | HAYDRA MACHINE | रु. १,०१८/- प्रती तास |
| 07 | CRAINE MACHINE | रु. ४,३६५/- प्रती तास |
| 08 | MAN POWER | रु. ५३५ /- प्रती मजुर प्रती दिवस |

**सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांचे प्राप्त दर**

| Sr. No. | Type of Machinery | क्षमता | वाटाघाटी नंतरचे दर | |
|---|---|---|---|---|
| 01 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. | 10 HP | रु. ४३५/- प्रती तास | रु. १,०४,४८०/- प्रती महिना |
| | | 15 HP | रु. ४७७/- प्रती तास | रु. १,१४,७२३/- प्रती महिना |

वरील प्रमाणे वाटाघाटी नंतर नालेसफाई कामी प्रभाग समिती क्र. ०१ आणि ०२ करिता मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा.लि. व प्रभाग समिती क्र. ०३ आणि ०४ करिता मे. आशापुरा कंन्ट्रक्शन कंपनी यांना देण्यात यावा. तसेच विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु. १.५० कोटीची आर्थिक मंजूरी देत आहे व सदर कामासाठी प्रत्येक प्रभागात १ अधिकारी त्यावर देखरेखीसाठी नेमावा. मजूरांची बायेमेट्रीक पध्दतीने रोज येण्याजाण्याची हजेरी घेण्यात यावी. प्रत्येक गाडी, जेसीबी, पोकलन जेथे लावण्यात आलेली आहे. तेथेच असल्याची नोंद घेण्यात यावी, जर सदर कामी अफरतफर झालेली आढळल्यास ठेकेदारावर कारवाई करुन त्याला काळ्या यादीत टाकावे व त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. तसेच शहरात बऱ्याच ठिकाणी मोठ्या नाल्याचे काम अर्धवट पूर्ण झाले आहे. त्यामुळे त्याचे पाणी पुढे जाण्याकरीता चार रस्त्यावर ३ फुटाचे व्यासाचे १ किंवा २ पाईप टाकण्यात येतात. परंतु सदर नाल्याची रुंदी १५ ते २० फुट असल्याने सदर पाणी मोठ्या प्रवाहाने वाहत असल्याने पाईपवाटे जाण्यास अडथळा निर्माण होते म्हणून सदर जागी पाईप टाकण्याऐवजी कल्वर्ट बांधण्यात याव्यात. सदर कल्वर्टचे काम देखील नालेसफाईचा व पाण्याचा निचरा होण्यासाठीचा भाग असून नाल्यातील पाणी पुढे वाहून नेण्यासाठी गरजेचे असल्याने सदर कल्वर्ट बांधण्याच्या कामाची निविदा मागविण्यात यावी व आवश्यकतेनुसार आवश्यक त्या ठिकाणी कल्वर्ट बांधण्यात याव्यात. सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. सदरचा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अशरफ शेख :-**

मा. सभापती महोदय, ह्या गोषवाऱ्यामध्ये आपण ४ प्रभागाचा उल्लेख केलेला आहे. परंतू आता ४ नाहीत. आपल्याकडे ६ प्रभाग आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब त्या जुन्या प्रभाग समित्या आहेत.

**अशरफ शेख :-**

ठिक आहे. पण तसा उल्लेख का केला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण जुन्या प्रभाग समितीप्रमाणे केले आहे.

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहेब यह काम करने का डंपर का शिफ्ट लिखा है। शिफ्ट में कितने घंटे काम करने का।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

८ घंटे काम करने का.

**प्रभात पाटील :-**

वाचताना अस वाटलं की एम.ई.प्रा.लि. च्या ऐवजी आशापूरा ते शेवटचे चेंज झाले आहे? १ आणि २ एम.ई. प्रोजेक्ट आहे त्याच्याऐवजी आशापूराला दिले आहे. आणि ३ व ४ मध्ये एम.ई. आले आहे.

**मा. सभापती :-**

तिथे अदलाबदल.

**राजेंद्र जैन :-**

१. लेबर (Man Power) – प्रत्येक मुकादमाकडून किती कामगार नालासफाईकरीता लावण्यात आले त्यांची हजेरी तसेच हजेरी वरील किती कामगार कुठे काम करीत आहेत याचा अहवाल १ तासाच्या आत संबंधित प्रभाग कार्यालयात तसेच लेखापरीक्षक व मा. आयुक्त यांचेकडे पोच करावा. त्यासोबत मुकादमाचे नाव व मोबाईल नंबर असणे जरूरीचे आहे.

२. Type of machine - कोणत्याप्रकारच्या मशीन कुठे, किती वाजता लावण्यात आल्या त्याचा अहवाल संबंधित मुकादमाने आपल्या नाव व मोबाईल नंबर सहित १ तासाच्या आत संबंधित प्रभाग कार्यालयात तसेच लेखापरीक्षक व मा. आयुक्त यांचेकडे पोच करावा.

३. Suction Pump (Per Month) - Will not be placed

१. प्रती तासावर कुठे व किती Suction Pump त्याच्या HP क्षमतेसह लावण्यात आले याचा अहवाल पुढच्या दिवशी संबंधित प्रभाग कार्यालयात तसेच लेखापरीक्षक व मा. आयुक्त यांचेकडे पोच करावा.

जर संभव असेल तर प्राप्त सर्व अहवाल नगरसेवकांना त्यांच्या टॅबवर उपलब्ध करून द्यावेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, सुचना चांगली आहे. सक्शन पंप संध्याकाळी रात्री लावायचे असल्यास एका तासात ते आम्हाला शक्य नाही. रात्री पाऊस पडला तर सक्शन पंपचा आवाज कसा देणार. सोसायटीचे पत्र घेतो. जे.सी.बी. पोकलन, मॅन पॉवर ते शक्य आहे.

**राजेंद्र जैन :-**

जो महिने भरके लिए लगाएगे वह तो फिक्स हे।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते लावणारच नाही.

**राजेंद्र जैन :-**

जो घंटेभर लगाएगे अगर एक घंटे में दे सकते हे तो कमसे कम...................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सिर्फ वह उसका जेसीबी देखेंगे, पोकलन, बोट, पोकलन और मॅन पॉवर का....................

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेबने आपको बोला, पोकलन मशिन, मजूर वह देगें, पंप का उनकी बात बराबर है की, रात को होगा तो किसको उठाएगें।

**राजेंद्र जैन :-**

नेक्स्ट डे चलेगा। महिनेभर आप लगाएगे, नही वह तो स्पष्ट हो गया।

**मा. सभापती :-**

ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे. आणि त्या सुचनेमध्ये जो बदल सांगितला आहे. तो बदल करून घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. ०१ :-**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात नालेसफाई कामी लावगणारी आवश्यक यंत्रसामंग्री व संक्शन पंप भाडयाने घेणे कामाच्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ०१ :-**

महापालिका क्षेत्रातील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षा करीता पावसाळ्यापुर्वी नाले सफाई कामी आवश्यक यंत्रसामुग्री तसेच विविध क्षमतेचे सक्शन पंप भाडयाने पुरवठा कामाची ई-टेंडरींगद्वारे दि. २८/३/२०१४ पर्यत निविदा मागविण्यात आली होती. प्रभाग समिती क्र. ०१ ते ०२ करीता मे.एम.ई. प्रोजेक्ट प्रा.लि. व प्रभाग समिती क्र. ०३ ते ०४ करीता मे.आशापुरा कंन्स्ट्रक्शन कंपनी तसेच सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी या कंपनी समवेत यांनी सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून आलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**प्रभाग समिती क्र. ०१ व ०२ (जुनी) करीता मे. एम.ई.प्रोजेक्ट प्रा. लि. यांचे प्राप्त दर :-**

| Sr. No. | Type of Machinery, Equipment & Manpower | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|
| 01 | POCLAIN MACHINE – 200 | रु. १,९३०/- प्रती तास |
| 02 | POCLAIN MACHINE WITH BOAT | रु. २,१८२/- प्रती तास |
| 03 | JCB MACHINE | रु. १,०५७/- प्रती तास |
| 04 | DUMPER | रु. ५,८९७/- प्रती शिफ्ट |
| 05 | TORAS | रु. ८,६३३/- प्रती शिफ्ट |
| 06 | HAYDRA MACHINE | रु. १,०१८/- प्रती तास |
| 07 | CRAINE MACHINE | रु. ४,३६५/- प्रती तास |
| 08 | MAN POWER | रु. ५३५ /- प्रती मजुर प्रती दिवस |

**प्रभाग समिती क्र. ०३ व ०४ (जुनी) करीता मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कपंनी यांचे प्राप्त दर :-**

| Sr. No. | Type of Machinery, Equipment & Manpower | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|
| 01 | POCLAIN MACHINE – 200 | रु. १,९३०/- प्रती तास |
| 02 | POCLAIN MACHINE WITH BOAT | रु. २,१८२/- प्रती तास |
| 03 | JCB MACHINE | रु. १,०५७/- प्रती तास |
| 04 | DUMPER | रु. ५,८९७/- प्रती शिफ्ट |
| 05 | TORAS | रु. ८,६३३/- प्रती शिफ्ट |
| 06 | HAYDRA MACHINE | रु. १,०१८/- प्रती तास |
| 07 | CRAINE MACHINE | रु. ४,३६५/- प्रती तास |
| 08 | MAN POWER | रु. ५३५ /- प्रती मजुर प्रती दिवस |

**सक्शन पंप पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांचे प्राप्त दर**

| Sr. No. | Type of Machinery | क्षमता | वाटाघाटी नंतरचे दर | |
|---|---|---|---|---|
| 01 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. | 10 HP | रु. ४३५/- प्रती तास | रु. १,०४,४८०/- प्रती महिना |
| | | 15 HP | रु. ४७७/- प्रती तास | रु. १,१४,७२३/- प्रती महिना |

वरील प्रमाणे वाटाघाटी नंतर नालेसफाई कामी प्रभाग समिती क्र. ०१ आणि ०२ करिता मे. एम. ई. प्रोजेक्ट प्रा.लि. यांनी व प्रभाग समिती क्र. ०३ आणि ०४ करिता मे. आशापुरा कंन्ट्रक्शन कंपनी यांनी तसेच विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेल्या दरास ही सभा मंजुरी देत आहे. सदर कामी रक्कम रु. १.५० कोटीची आर्थिक मंजूरी देत आहे.

सदर कामासाठी प्रत्येक प्रभागात १ अधिकारी नेमावा. मजूरीची दररोज हजेरी घेण्यात यावी. प्रत्येक गाडी, जेसीबी, पोकलन जेथे लावण्यात आलेली आहे. तेथेच असल्याची नोंद घेण्यात यावी, जर सदर कामी अफरतफर झालेली आढळल्यास ठेकेदारावर कारवाई करुन त्याला काळ्या यादीत टाकावे व त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात यावी.

तसेच शहरात बऱ्याच ठिकाणी मोठ्या नाल्याचे काम अर्धवट झालेले आहे. त्यामुळे पाणी पुढे जाण्याकरीता ज्या रस्त्यावर १/२/३ फुट व्यासाचे आर.सी.सी. पाईप टाकण्यात येतात. परंतु सदर नाल्याची रुंदी १५ ते २० फुट असल्याने पावसाळी पाणी पाईपवाटे कमी प्रमाणात जाते. या ठिकाणी पाईप ऐवजी कल्वर्ट बांधण्यात यावे. सदर कामाची निविदा मागविण्यात यावी. सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

सदरचा ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य डॉ. राजेंद्र जैन ह्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

१. लेबर (Man Power) – प्रत्येक मुकादमाकडून किती कामगार नाले सफाईकरीता लावण्यात आले त्यांची हजेरी व कामगार कुठे काम करीत आहेत याचा अहवाल १ तासाच्या आत मा. आयुक्त, मा. मुख्य लेखापरीक्षक, प्रभाग अधिकारी यांचेकडे पोच करावा. त्यासोबत मुकादमाचे नाव व मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.

२. मशिनरी कोणत्या प्रकारच्या मशीन कुठे व किती वाजता लावण्यात आल्या याचा अहवाल संबंधित मुकादमाने त्याचे नाव व मोबाईल नंबर सह मा. आयुक्त, मा. मुख्य लेखापरीक्षक, प्रभाग अधिकारी यांचेकडे १ तासाच्या आत सादर करावा.

३. सक्शन पंप (प्रतिमहिना) Monthly maximum 6 point not more than 1 pump at one point लावण्यात यावे. यावा अहवाल मा. आयुक्त, मा. मुख्य लेखापरीक्षक, प्रभाग अधिकारी यांचेकडे दुसऱ्या दिवशी सादर करावा.

४. प्रती तासावर कुठे व किती सक्शन पंप त्याच्या एच.पी. क्षमतेसह लावण्यात आले, याचा अहवाल मा. आयुक्त, मा. मुख्य लेखापरीक्षक, प्रभाग अधिकारी यांचेकडे दुसऱ्या दिवशी सादर करावे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ १२.५५ वाजता.)**

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ३०/०५/२०१४

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ३०/०५/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३०/०५/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. २६/०५/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्री. राजु यशवंत भोईर | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ६. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ७. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ८. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ९. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| १०. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ११. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| १२. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १३. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| १४. | श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २) | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व अधिकाऱ्यांचे हार्दिक स्वागत. आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी त्यासाठी सर्व सदस्यांचे, सर्व अधिकाऱ्यांचे सहकार्य जरुरी आहे. सचिव साहेब सभेला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३०/०५/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०२, दि. २६/०५/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय ह्या ठिकाणी गेल्या काही महिन्यापासून शिवसेना भारतीय जनता पार्टी, एन.डी.ए. चे सरकार स्थापनेबाबतचे वातावरण चालू होते. त्या मध्येच पंतप्रधानपदी आदरणीय नरेंद्र मोदी ह्यांचा २६ तारखेला शपथविधी झालेला आहे. म्हणून मी स्थायी समिती सभागृहामध्ये त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**राजेंद्र जैन :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**अभिनंदन ठराव ०२ :-**

शिवसेना, भारतीय जनता पार्टी, एन.डी.ए. चे सरकार स्थापनेबाबतचे वातावरण चालू होते. त्या मध्येच पंतप्रधानपदी आदरणीय नरेंद्र मोदी ह्यांचा २६ तारखेला शपथविधी झालेला आहे. म्हणून मी स्थायी समिती सभागृहामध्ये त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहीदास पाटील :-**

मा. सभापती साहेब सभा कामकाज चालू करायच्या अगोदर मला दोन तीन विषयावर चर्चा करायची आहे. ही सभा आणि महापालिका पहिल्यांदा सांगा महापालिकेची जी प्रॉपर्टी आहे ती टिकवायचे आपले कर्तव्य समजतो. महापालिकेची जी प्रॉपर्टी आहे त्याची आपल्याकडून जरी चूक झाली तरी महापालिकेच्या अधिका-याचे ते कर्तव्य आहे की, ती प्रॉपर्टी टिकवली पाहिजे. नगरपरिषदेने बनवलेले डि.जी. मार्केट जवळ नगरपरिषदेच्या मालकीचे सुलभ शौचालय एका विकासकाने तोडले. त्यासाठी मी मा. आयुक्त, सिटी इंजिनियर, एक्झीकेटीव्ह इंजिनियर ह्यांच्याकडे तक्रार केली की, काय झाले आहे त्याची माहिती मिळाली आणि ती रितसर कायदेशीर माहिती मिळावी त्याचे संबधीतानी नीट उत्तर द्यावे.

**मा. सभापती :-**

तुमच्याकडे काय माहिती असेल ती देऊन टाका.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माहिती काढायला लागेल.

**रोहिदास पाटील :-**

अधिकारी आहेत त्यांना निर्देश द्या. सभेचे कामकाज असे असते संबधीत खात्याच्या माणसाला मी नाव सांगितली. मा. आयुक्त, सिटी इंजिनियर, एक्झीकेटीव्ह इंजिनियर ह्या तिघांशी नीट लेखी पत्र देवून तोंडी बोलून ही घटना झालेली आहे. महापालिकेची प्रॉपर्टी एखादा विकासक तोडायची हिंमत होते. ते महापालिकेच्या निदर्शनास आणली.

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, सदर ठिकाणी शौचालय तोडले आहे ही वस्तूस्थिती आहे. ह्याबाबात आम्ही पाहणी केली आहे. ते कोणी तोडले कोणत्या विकासकाने तोडले आहे त्याची माहिती घेऊन करायचा असेल तर गुन्हापण दाखल करू. साहेब त्याची माहिती घेतो की, परमिशन कोणाला दिली आहे. बिल्डर कोण आहे, कोणी तोडल त्याची माहिती घेऊन कारवाई करतो.

**रोहीदास पाटील :-**

खांबित साहेब तुम्ही कार्यकारी अभियंता आहेत. ह्या महापालिकेत अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांनी निवेदन केले तर त्याला जर तर येऊ शकते. तुम्ही सगळयाचे साक्षीदार आहात. तुम्ही उत्तर देताना जबाबदारीने दिले पाहिजे. मला तुम्ही आधी एक उत्तर दिले की, ते आपण बनवले असा रेकॉर्ड मिळत नाही. त्यावेळी प्रशासक भगत साहेब होते भगत साहेबांच्या देखरेखेखाली मान्यतेने बारकूंड साहेबाच्या उपस्थितीत हे नगरपरिषदेचे शौचालय झाले होते. स्टेशनवरून उतरणा-या लोकांना त्याठिकाणी कारखाण्यात काम करणा-या कामगारांना सगळयांना उपयोगी पडत होते. आणि राजरोस इतकी वर्ष ते चालू होते एका रात्रीत तोडले.

**दिपक खांबित :-**

आम्ही माहिती घेतो.

**रोहीदास पाटील :-**

किती दिवस झाले तुम्हाला किती दिवस अपेक्षा आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, १५ दिवसात कारवाई करतो.

**रोहीदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, मी मागणी करतो महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीला हात लावायला कोणाला हिंमत होते कशी त्यांची भाषा अशी आहे की १० लाख रू. खर्च केले १२ लाख खर्च केले कोणाला केले. आम्ही तिकडचे विध्यमान नगरसेवक आहात. नगरसेवकाना पैसे दिले की अधिका-याना पैसे दिले हा अस्मितेचा प्रश्न आहे आमच्या सारख्या जनप्रतिनिधीच्या अस्मितेचा प्रश्न आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो १५ दिवसात कारवाई करतो असे स्टेटमेन्ट दिले आहे.

**रोहीदास पाटील :-**

मी अजून म्हणतो ती जागा महापालिकेची आहे. त्या दृष्टीने कारवाई झाली पाहिजे.

**मा. सभापती :-**

खांबित साहेब, १५ दिवसात ह्याचार निर्णय झाला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

हो.

**रोहीदास पाटील :-**

मा. सभापती साहेब धोकादायक इमारतीबद्दल आपले काय धोरण आहे. १ मार्चला गोडदेव नाक्यावर इमारत पडली. तीन तास वाहतूक बंद पडली. महापालिकेचे नगरसचिव हरेश पाटील, सिटी इंजिनियर शिवाजी बारकूंड, पोलिस अधिकारी, वाहतूक अधिकारी आम्ही नगरसेवक तिथे हजर होतो. त्या बिल्डींगची आजची पोझीशन काय आहे. बिल्डींग धोकादायक ठरली की, महापालिका ह्या पध्दतीने कामकाज करेल असे काही धोरण आहे की नाही नाक्यावरची बिल्डींग आहे. त्या बिल्डींगमध्ये माणस राहतात पहिल्यांदा खाली झाली. आता लोक राहायला लागली महापालिकेची कोणतीही कारवाई नाही. ती बिल्डींग जर कोसळली. दिवस रात्र लोक चालतात. तिकडे काय घटना घडली तर तिकडचे नगरसेवक बांधील आहेत की राहणारे लोक आहेत. मला नक्की माहित आहे ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी अजून आतमध्ये बसले. नगरसेवक आतमध्ये थकले आणि मग बाहेर निघाले. तुम्हाला कोणाला आतमध्ये घ्यायचे आहे. महापालिकेचे धोरण काय असेल तर आम्ही सभागृहामध्ये बोलणार नाही. लोक आपल्यालाही विचारतात उत्तर द्या.

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, भाईंदर पूर्व भागात बी.पी. रोडवर काशीनाथ स्मृती ही जी बिल्डींग आहे. त्याचा थोडा भाग कोसळला होता. त्यावेळी त्याचे स्ट्रक्चर ऑडीट केले. तिला धोकादायक म्हणून डिक्लेर केले आणि त्यांना नोटिसा वैगेरे दिल्या. संबंधीत रहिवासी कोर्टामध्ये गेले. त्यांना अजून स्टे मिळाला नाही. परंतू न्याय प्रविष्ठ बाब असल्याने आपण न्यायालयामध्ये ही धोकादायक इमारत आहे. आणि तोडणे गरजेचे आहे. असे ॲफिडेव्हीट आणि प्रतिपादन केलेले आहे.

**रोहीदास पाटील :-**

हे प्रकरण कोर्टात गेले आहे ते बरोबर आहे. त्याच्या मधल्या काळामध्ये तुम्ही त्यांना नोटिस दिली की दोन मे आधी ही बिल्डींग जर खाली केली नाही तर आम्ही लाईट कापणार, पाणी कापणार पोलिसांचे सहकार्य घेवून बिल्डींग खाली करणार त्यांच्या पूढची काही करवाईच केली नाही. आता कोण मेलं तर त्याला जबाबदार कोण? खांबीत साहेब, सिटी इंजिनिअर की आयुक्त एवढ उत्तर द्या. संपल, मरणार असेल तर मरेल त्याला हिम्मत असेल त्यांना राहायचच आहे. तर त्याला त्यांच्यामध्ये ठेवा.

**दिपक खांबित :-**

कोर्टाची १७ जुन तारीख आहे.

**रोहीदास पाटील :-**

तारखेचा संबंध नाही. तुम्ही दिलेल्य नोटिसीची तुम्ही करवाई केली का? कोर्टात गेल्यानंतर तुम्ही नोटिस बजावली आहे. म्हणून विषय आणलेला आहे. २/५ ला बिल्डींग त्यानी खाली केली नाही. तर तुम्ही करणार. त्या कारवाईचे सांगा. नाहीतर कोर्टाचा निर्णय लागेपर्यंत तुम्ही कारवाई करणार नाही असे सांगा विषय संपला.

**दिपक खांबित :-**

कोर्टाच्या निर्देशानुसार त्याच्या निर्णयानुसार आम्ही कारवाई करू. कोर्टाच्या निदर्शनास आणू की, ही बिल्डींग धोकादायक आहे. तर लवकरात लवकर डिसीजन द्या.

**रोहिदास पाटील :-**

अशी जर विनंती तुम्हाला कोणी केली आणि तुम्ही सांगता कोर्टाला मी विनंती करतो. माझ्या वॉर्डाचा डी.जी. मार्केट मा. सभापती साहेब हे रेकॉर्डवर आणण्यासाठी मी बोलतो. धो-धो पाऊस पडत होता. एक निर्दयी अधिकारी एक खांबित साहेब, दोन बारकुंड साहेब बाळ त्या बाईच्या हातात होत ती सांगते की मी पाच दिवसात खाली करतो. ह्या लोकांनी त्या लोकांना बाहेर काढले आहे. टी.बी. पेशन्ट होता त्याला बाहेर काढलेले आहे. आणि बिल्डींग त्याच दिवशी खाली करून पाडलेली आहे. ही कामाची पध्दत आहे. अधिकाऱ्यांना माहिती व्हावे रेकॉर्डवर यावे म्हणून मी हे बोललेलो आहे.

**मा. सभापती :-**

काकांनी जे म्हणण मांडले त्याच्यात सत्यता आहे आणि कुठेही भेदभाव होऊ नये करायचे ते सगळ्यांना एक नियमाने करा. अशी आमच्या सगळ्यांची विनंती आहे. एकाला एक नियम दुसऱ्याला दुसरा नियम एखाद्याला तोडायचे तर लगेच तोडून मोकळे होता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तोडणार होतो पण कोर्टाचा स्टे आल्यामुळे राहिले आहे हे पण तोडणार.

**मा. सभापती :-**

भेदभाव न ठेवता एका नियमाने करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २, दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रशांत दळवी :-**

पान नं. ७ मा. आयुक्त महोदय फेरीवाला समिती गठित झाली का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ढगे साहेब रजेवर आहेत. अतिक्रमणचा विषय त्यांच्याकडे आहे.

**प्रशांत दळवी :-**

सावंत साहेब, चार्ज काढून घेतला का? मग ते निश्चीत करणार? तुमच्याकडे होत ना. स्टेटमेंट दिलेले आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरण कोर्टाने काय सांगितले आहे. किती महिन्यांत करायचे आहे. ते मी विचारतो हे प्रोसेडींग असेच ठेवू या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हा मुद्दा पुढच्या स्टँडीगला घेऊ.

**प्रशांत दळवी :-**

साहेब कोर्टाने कधी निर्देश दिले आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी आचारसंहिता होती.

**प्रशांत दळवी :-**

समिती गठित करण्यासाठी आचारसंहितेचा काही संबंध येत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. आयुक्तांनी त्यांच्यासोबत चर्चा केली.

**प्रशांत दळवी :-**

राष्ट्रीय फेरीवाला धोरण हे तुमचे स्टेटमेंट आहे. ते कोणी गठित करायचे. कोण करणार. हायकोर्टाचे काय निर्देश होते. चार महिन्यांत करायचे ना फेरीवाला समिती.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अतिक्रमण विभाग करणार असे ठरले होते.

**प्रशांत दळवी :-**

अतिक्रमण आणि ह्याचा काय संबंध आहे. राष्ट्रीय फेरीवाला धोरण त्याचे महापौर अध्यक्षा असतील. त्याचा अतिक्रमणशी काय संबंध. मला सांगा कमिटी तरी बनवली का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या संदर्भात अतिक्रमणाचे उपायुक्त रजेवर आहेत.

**प्रशांत दळवी :-**

कधीची प्रोसेडिंग करतो आणि ह्याची उत्तरच नसतील. का करत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

करायची आहे. मॅन्डेटरी आहे. पण आज त्याचे उत्तर देण्यासाठी संबंधित अधिकारी उपस्थित नसल्यामुळे मला ते सांगता येणार नाही.

**प्रशांत दळवी :-**

आमचा स्पष्ट आरोप आहे ह्या फेरीवाल्याशी संगनमत वगैरे झाले आहे. का गठित करत नाही. हायकोर्टाचे निर्देश आहेत. आज अतिक्रमण वाल्यांना विचारले कारवाई का केली नाही तर म्हणतात की समिती अजून गठित नाही. नेमक कुठे बसायचे ते धोरण ठरले नाही. त्यामुळे कारवाई करता येत नाही. न्यायालयाचा अवमान करता का? न्यायालयाने निर्देश दिले आहेत. न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत चार महिन्यात समिती गठित करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

नाही केल तर आमच्यावर कन्टेक्ट होणार आज मिटींग झाल्यानंतर मा. आयुक्तांशी चर्चा करतो.

**प्रशांत दळवी :-**

किती कन्टेक्ट झाले आहेत, काय फरक पडला. न्यायालयाने समिती गठित करायला निर्देश दिले त्याला आठ महिने झाले. मा.सभापती महोदय निर्देश द्या. लवकरात लवकर अंमलबजावणी करा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मिटींग झाल्यावर मा.आयुक्तांशी लगेच चर्चा करतो. आणि समितीची प्रोग्रेस काय ते पुढच्या स्टँडींगमध्ये सांगतो.

**मा. सभापती :-**

मा. सदस्य प्रशांत दळवीजोने जी सुचना मांडली आहे. आणि जे कारण जरूरी आहे ते लवकरात लवकर करून घ्यायच आहे. पानपट्टे साहेब जेव्हा कुठचे विषय असतात आणि विभागाचे अधिकारी नसतात तर त्याची

उत्तर तुम्ही देऊ शकत नाही. मग ते उत्तर कोणी द्यायचे. तो विषय आपण पेंडींग ठेवायचा का? ही चर्चा सदस्याच्या माध्यमातून झालेली आहे. एखादा विभागीय अधिकारी नसेल तर त्याचे उत्तर उपायुक्तांनी द्यायचे. तुम्ही बसले आहेत. तुम्ही जबाबदार आहेत. तुम्ही उत्तर द्यायला पाहिजे. असे बोलून चालणार नाही की मला माहित नाही.

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब तुमच्याकडे अधिकाऱ्यांच्या रजेचे वैगेरे काय आले आहे का? सभापतींना देखील काही कल्पना न देता अधिकारी गैरहजर राहणार असेल तर सभागृह कसे चालवायचे उत्तर कोणी द्यायची.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

दि. १३/१२/२०१३ व दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३, मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१४, ठराव क्र. १४६ व दि. २६/०२/२०१४, ठराव क्र. १५६ मध्ये मूळ गोषवाऱ्या व्यतिरीक्त बाबीबाबत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल.

**अश्विन कासोदरिया :-**

सदरचा प्रस्ताव पुढच्या स्थायी समिती सभेमध्ये घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०३ :-**

मा. स्थायी समिती सभा दि. १७/०२/२०१४ ठराव क्र. १४६ व दि. २६/०२/२०१४ ठराव क्र.१५६ मध्ये मुळ गोषवा-या व्यतिरिक्त बाबीबाबत झालेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी बाबतचा अहवाल.

**ठराव क्र. ०४ :-**

सदरचा प्रस्ताव पुढच्या स्थायी समिती सभेमध्ये घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अश्विन कासोदरिया अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग मतीमंद मुलांना प्रशिक्षण देणा-या "प्रशिक" या संस्थेस भाड्याने उपलब्ध करुन देणे निर्णय घेणे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खांबित साहेब माहिती आहे का?

**हंसुकुमार पांडे :-**

यह मंदबुध्दी बच्चो का विषय है। इसमे जो रेट लगाया है इसको जरा नॉमिनल करके मिरा भाईंदर शहर में ऐसा सुविधा है ही नही। अगर यह हो रहा है तो अच्छी बात है।

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. प्रशिक ही जी संस्था आहे. ती मतीमंद मुलाची शाळा चालवते. ती गेल्या सहा वर्षापासून भाडेतत्वावर एका ठिकाणी शाळा चालवायची. त्यांनी आपल्याकडे मागणी केली की तुमच्या शाळेतील वर्ग सवलती दराने आम्हाला उपलब्ध करून द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे शाळेची जागा उपलब्ध आहे. आम्ही जो प्रश्न विचारतो ह्यासाठी विचारतो. मतीमंद मुलांच्यासाठी एक संस्था प्रामाणिक प्रयत्न करते. महापालिकेचे काय कर्तव्य आहे. महापालिका काय करते. महापालिकेच्या वतीने त्या मुलांच्या दृष्टिने आपण काही प्रामाणिक प्रयत्न केला आहे, की नाही केला, करू इच्छितो, की नाही इच्छितो. ही एक संस्था करते त्यांना जागा देणे माझे मत आहे. एक रूपया लावा तो विषय नंतर घेऊ. आपण सगळ्यांनी ठराव करू या. पण त्याच्या पलीकडे त्या मतीमंद मुलांना महापालिकेने आजपर्यंत काऊन्ट केले आहे की नाही केले. त्यांच्यासाठी आपण काही प्रयत्न केले की नाही केले अशी माहिती पाहिजे.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ शिक्षण विभाग ह्यांच्या मार्फत सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत अपंग समावेशक शिक्षणाच्या अंतर्गत विशेष शिक्षक आहेत. ते विशेष शिक्षक आपल्या शहरातील शाळेमध्ये जे मतीमंद विद्यार्थी आहेत ह्या मतीमंद विद्यार्थ्यासाठी आठवड्यातील एक ठराविक दिवस निश्चीत करून त्यांना आपण शिक्षण देण्यासाठी जातात. असे आपल्या जवळ १८ विशेष शिक्षक आहेत. मग नगरपालिकेची शाळा असो किंवा खाजगी शाळा असो प्रत्येक शाळेमध्ये आठवड्यातून एक दिवस जाऊन शिक्षण देतात. आपल्याकडे दोन हजार गतीमंद विद्यार्थी आहेत. मतीमंद आणि गतीमंद असे दोन आहेत.

**रोहिदास पाटील :-**

गतीमंद आणि मतीमंद म्हणजे काय?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

गती म्हणजे जे अभ्यासात मागे आहेत, मतीमंद म्हणजे पॅरलाईज वगैरे असे दोन प्रकार आहेत. असे दोन्ही मिळून दोन हजार विद्यार्थी आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे नवघरला जागा आहे का?

**प्रशांत दळवी :-**

मा. आयुक्त महोदय तुम्ही म्हणता ॲग्री. ती मुल आपल्या शाळेत शिक्षण घेतात का?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

हो. काही मुल आपल्या शाळेमध्ये शिक्षण घेतात.

**प्रशांत दळवी :-**

मतीमंद मुल शिक्षण घेतात की गतीमंद मुल शिक्षण घेतात.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

आपल्याकडे दोन्ही प्रकारची मुल शिक्षण घेतात.

**प्रशांत दळवी :-**

आपल्या शाळेमध्ये मतीमंद मुल कशी शिक्षण घेतील.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

काही शाळेमध्ये मतीमंद मुलपण आहेत.

**प्रशांत दळवी :-**

आपण मतीमंद मुलांचे वर्ग सुरू केले आहेत का?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

वर्ग सुरू नाही केले. पण त्या मुलांना स्पेशल...........

**प्रशांत दळवी :-**

असे आपले मतीमंद किती मुल आहेत.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

आपल्याकडे दोन्ही मिळून दोन हजार विद्यार्थी आहेत. मतीमंद आणि गतीमंद असे दोन्ही एकत्र आहेत.

**अशरफ शेख :-**

मतीमंद किती आहेत. मतीमंद आणि गतीमंदमध्ये फरक आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही जी संस्था काम करते ही मुल गोळा करूनच करते. त्यांना आपण काही अर्थसहाय्य करू शकतो की नाही करू शकत. ती संस्था इथे तिथे देणग्या गोळा करते. आपल्यापैकी पण कोणी देणग्या दिल्या असतील. माझ्याशी देखील संबंधित आहेत. आटापीटा करून ते चालवतात. आपल्या महापालिकेचे कर्तव्य म्हणून नियमात बसते म्हणून आपण त्यांला काही देऊ शकतो की नाही देऊ शकत.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. अशा संस्थेला मदत करणे म्हणजे आपल्याकडे सर्व शिक्षा अभियांना अंतर्गत फक्त शिक्षक उपलब्ध करून देणे. आपल्या कडे एकूण १८ शिक्षक आहेत. विशेष शिक्षक आहेत. उपलब्ध करून देणे आणि ज्या ठिकाणी मतीमंद गतीमंद विद्यार्थी आहेत तेथे जाऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकवतात. अशा संस्थेला कोणत्याही प्रकारची विशेष मदत करणे अशी आपल्याकडे तरतूद नाही.

**अशरफ शेख :-**

लोकांना माहितच नाही की मतीमंदसाठी पालिकेने काही केले किंवा काय करते.

**प्रशांत दळवी :-**

साहेब दोन हजार मुल आहेत हो गतिमंद आणि मतीमंद. मला आज माहित पडले आहे. त्याच्यावर १८ शिक्षक आहेत. आपण त्याचे स्पेशल वर्ग का नाही चालु करू शकत.

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

तशी तरतूद नाही.

**प्रशांत दळवी :-**

त्या मुलांना आपण समाविष्ठ करून घेऊ शकतो का?

**मोहिते (शिक्षण अधिकारी) :-**

नाही करू शकत.

**प्रशांत दळवी :-**

ह्या संस्थेमध्ये ३५ ते ४० विद्यार्थी शिक्षण घेतात त्याच्यासाठी आपली महापालिका काय करू शकते. ठोक मानधनावर हि जी संस्था आहे. त्यांना आपण सहकार्य करू शकतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याचा अभ्यास करा. आमचे असे मत आह की त्या विद्यार्थ्यांची संस्था बघून त्यांचे चाललेले कामकाज बघून पुढच्या मिटींगला विषय घ्या. सभापती महोदय विषय असा आहे की जी जागा मागितली आहे ती जागा आपल्या महापालिकेच्या इमारतीतील आहे की बाजूला बनवले आहे ते आहे.

**दिपक खांबित :-**

इमारतीमधली आहे.

**रोहिदास पाटील :-**

बाजूला इमारत बनवली आहे त्याचे काय. ती वर्ष झाल बंदच आहे. आपली प्रॉपर्टी ओस पाडून ठेवतो अशी मी चार उदा. देतो. अधिकाऱ्यांना ते काही माहितच नाही. ते तसेच ताळ लागलेल आहे. आणि जिथे शाळा चालते तिथे तुम्ही वर्ग द्यायचे सांगता.

**मा. सभापती :-**

हा विषय आपण पुढच्या मिटींगला घेऊ त्या विषयावर मी कमिश्नर साहेबांशी बोलतो.

**रोहिदास पाटील :-**

नवघर शाळेमध्ये मराठी, हिंदी शाळा चालते. दोन्ही शाळा चालून देखील एक वर्ग मोकळा आहे. तुम्ही तिकडे प्रत्यक्ष पाहणी केली? त्याला बसायला जागा नाही. हे तुम्ही कष्ट करत नाही. हंसुकुमारजी हमको यह बताने का है उधर बिल्डींग खाली है उसको ताला मारके उसको यूज मे लाना नही है। और जिधर बैठने को जगह नही है उधर अपून को समझदार नही बोलके दे दिया. ठराव हो गया। क्यो ऐसा करते है। वह देने को हमारा विरोध नही रहेगा। बिल्डींग कौन सा है वह पक्का बोलो।

**दिपक खांबित :-**

शाळेचे वर्ग आहेत तिकडे थेरेपी सेंटर जे आहे. पाठीमागे एक बिल्डींग बांधली आहे तिकडे शिफ्ट केले आहे. सर्व समावेशक संस्था व प्रशिक्षण केंद्राकरीता शासनाने १७ लाख रूपये दिले. त्याच्यामध्ये ती बिल्डींग बांधली आणि त्या जागेमध्ये थेरेपी चालवायची तिकडे ती आपण शिफ्ट केली. त्यामुळे वर्ग रिकामे झाले त्यामुळे जागा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी द्यायला विरोध करतच नाही. पण सभापती साहेब हिंदी वाल्यांना मराठी वाल्यांना तिथे जागा नाही आहे. त्याच्यावर दोन मजले बांधा तेव्हा ती गरज भागेल.

**मा. सभापती :-**

ते मागच्या बिल्डींगचे बोलतात.

**रोहिदास पाटील :-**

मागच्या बिल्डींगमध्ये त्यांनी थेरेपी वाले घातले.

**दिपक खांबित :-**

आहे ना साहेब, रिपोर्ट घेऊनच आम्ही आणले आहे ना: जागा आहे म्हणून.................

**रोहिदास पाटील :-**

एक रूपया नॉमिनल भाड लावून त्यांना ठराव द्या असा मी ठराव मांडतो. कायदेशीर आहे की नाही सांगा.

**दिपक खांबित :-**

शैक्षणिक कामाकरीता देता येत.

**रोहिदास पाटील :-**

ह्या कामासाठी नाही.

**दिपक खांबित :-**

हे शैक्षणिक काम आहे ना, मग देता येत.

**रोहिदास पाटील :-**

देऊन टाका. ठराव मांडला आहे तू अनुमोदन दे.

**मा. सभापती :-**

त्यांना बघून घेऊ दे.

**रोहिदास पाटील :-**

आपला ठराव सर्वानुमते झाला असा एक रूपया भाड.

**अशरफ शेख :-**

मा. सभापती महोदय आपल्या नवघर मध्ये आहे. मिरारोडमध्ये पण करा.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. प्रभातताई को थोडा लेट हो गया उन्होने बोला था की इस विषय को लास्ट में लेना।

**रोहिदास पाटील :-**

भाईंदर (पूर्व) नवघर शाळा क्र. १३ च्या तळमजल्यावरील जागा मतिमंद मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी "प्रशिक" या संस्थेने उपलब्ध करुन देण्यास विनंती केलेली आहे. मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांनी नवघर शाळेच्या मळमजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही असे कळविलेले आहे. सदर जागेचे क्षेत्र १३८.३२ चौ.मी. असून सदर जागेचे चालू बाजार भावानुसार (रेडी रेकनर) रु. ६,७६८/- प्रति महिना होत आहे. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेत प्रदान करण्यात आलेले आहे. तरी सदर प्रस्तावात नमूद सर्व जागा शैक्षणिक कामासाठी रु. १/- प्रति महिना या दराने भाड्याने तीन वर्ष मुदतीसाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अशरफ शेख :-**

मा. सभापती महोदय ह्या विषयावर माझी एक सुचना आहे. आपण मतीमंद मुलांसाठी नवघरमध्ये करतो. मिरारोडमध्ये पण करा. मिरारोडला जागा आहे.

**मा. सभापती :-**

संस्थेची मागणी असेल तर करू. ह्या ठरावामध्ये मी एक मांडू इच्छितो की ती जागा ह्या शैक्षणिक कार्यासाठीच देण्यांत येत आहे. तीन वर्षाच्या आतमध्ये ते कार्य बंद केल्यास महापालिकेला हस्तांतरीत करण्यांत येईल.

**अशरफ शेख :-**

ह्या संस्थेला आपण रिक्वेस्ट करू. तिथे आणि मिरारोडला पण सुरू करा.

**मा. सभापाती :-**

तो आपण प्रस्ताव करू. ठराव सुचनेसह मंजुर करण्यांत येत आहे.

**वंदना पाटील :-**

आपण ज्या संस्थेला दिले आहे ते फी आकारणार का?

**रोहिदास पाटील :-**

आकारावी लागेल, नाहीतर चालेल कस.

**वंदना पाटील :-**

आपण एवढ करतो तर त्यांनी आकारणी कमी करायला पाहिजे. नगरपालिका देते ती त्यांनी फी पण कमी केली पाहिजे.

**प्रशांत दळवी :-**

आमचे असे म्हणणे आहे की, ह्या शिक्षिका आहेत त्यांना ठोक मानधनावर घ्याव. आणि पालिकेनेच मानधन द्याव. पालिकेने मानधन दिले तर विद्यार्थ्यांना फूकट शिक्षण मिळेल.

**वंदना पाटील :-**

आपण संस्थेला देतो त्याची फी आकारणार असेल त्याचा फायदा संस्थेला होणार ना. मुलांना फायदा होणार नाही. मी सांगते सगळच फ्री द्या.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजुर करण्यांत येत आहे. आपण जी सुचना मांडली आहे. ॲग्रीमेंटमध्ये त्याचा विचार करण्यांत येईल.

**वंदना पाटील :-**

साहेब तुम्ही संस्थेला सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

विद्यार्थ्यांकडून त्यांनी काही घेऊ नये. गरज पडली तर दुसऱ्या फंडातून काय करता येईल ते आपण बघू.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती साहेब माझी सुचना घ्या की त्यांना फी कमी करा.

**प्रकरण क्र. ०४ :-**

भाईंदर (पूर्व) नवघर शाळा इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग मतीमंद मुलांना प्रशिक्षण देणा-या "प्रशिक" या संस्थेस भाड्याने उपलब्ध करुन देणे निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०५ :-**

भाईंदर (पूर्व) नवघर शाळा क्र. १३ च्या तळमजल्यावरील जागा मतिमंद मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी "प्रशिक" या संस्थेने उपलब्ध करुन देण्यास विनंती केलेली आहे. मा. प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ यांनी नवघर शाळेच्या मळमजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही असे कळविलेले आहे. सदर जागेचे क्षेत्र १३८.३२ चौ.मी. असून सदर जागेचे चालू बाजार भावानुसार (रेडी रेकनर) रु. ६,७६८/- प्रति महिना होत आहे. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ४१ अन्वये महानगरपालिकेच्या मालमत्ता भाड्याने देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेत प्रदान करण्यात आलेले आहे. तरी सदर प्रस्तावात नमूद सर्व जागा शैक्षणिक कामासाठी रु. १/- प्रति महिना या दराने भाड्याने तीन वर्ष मुदतीसाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब ह्याला मान्यता देते वेळी आपण ही नी सगळी काम करतो. ती लोकांच्या सोयीच्या आणि आरोग्याच्या दृष्टिने करतो. आपण एवढी मोठी अमाऊन्ट मंजुरी देतो. माझी सभागृहाला विनंती आहे, आपण सगळी गटार बंद करत चाललो, माझे असे म्हणणे आहे आपण सगळी गटार बंद करत चाललो आहोत. माझे असे म्हणणे आहे आपण गटार बंद करतो ते एखाद्या विकासाच भल व्हाव म्हणून की राहणाऱ्या लोकासाठी जिथे कमीत कमी लोक राहतात जिथे आता विकास होत चालला आहे तिकडची सगळी गटार बंद होत चालली आहेत. ज्या ठिकाणी नवघर गांव आहे. ज्याठिकाणी मच्छि मार्केट आह. तिथे मटणाचे दुकान आहे. कोंबडीचे दुकान आहे. तो तंगड्या कापून टाकणारच. टाकल्यानंतर हंसुजी एक टाईम टेबल है एक तो हम इधर आने में लेट होता है। अमूक टाईम हो गया तो ५० कुत्ता लाईन मे खडा रहता है। ऐसा उधर स्थिति है। आप कभी भी जाके उसका व्हिडीओ ले सकते है। अनेक लोग बोलते है। हमारे तिनो प्रिन्सीपल लिखते है। एसके उपर स्लॅब नही डाला जाता है। इस साल तो ऐसा हो गया कॉलेज मे परिक्षा चालू हो गई अभी सेमीस्टर टर्म है। परिक्षा चालू होने के बाद दो बच्चे को उल्टी हुआ मै साहब को बोला एक्झाम बैठा बच्चे को उल्टी हुआ इधर आदमी खडा नही रह सकता। फिर दो दिन के बाद फिर हुआ फिर बोला, फिर एक दिन के बाद दो हुआ फिर बोला फिर मुझे जो बोलना है, उनको बोला अभी वह काम पे लगे है। काम पे किसके लिए लगे है इतना बदबू, रबडी जो बैठेला था, पाँच फुट का गाला भरेला है। वंदना तू जाऊन बघू शकते तो गाळा पाच फुट भरला आहे. हे महापालिकेचे कामकाज आहे. हे रेकॉर्डवर आणण्यासाठी आम्ही बोलतो. ह्यांना व्हिजिट द्यायला वेळ नाही. तो नाला तळापर्यंत साफ करा म्हणून प्रिन्सीपलनी ह्यांना नोटीस दिली आहे. दि. ११ तारखेला मोर्चा आहे. सगळे विद्यार्थी येतील. मोर्चा म्हणजे सामुदायिक निवेदन. प्रिन्सीपल देऊन काय ऐकत नाही. मुले देतील आपण सगळे या, त्याच्यावर स्लॅब टाकायला यांना काय अडचण आहे. सिटी इंजिनिअर आणि आरोग्य अधिकाऱ्याने सांगाव की, काय अडचण आहे. तुम्हाला हवी तेवढी पत्र लिहिली. हव्या तेवढ्या भेटी घेतल्या. अडचण असेल तर सांगा की महापालिकेकडे आर्थिक स्थिति नाही.

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब माझा पण वॉर्डचा सेम प्रश्न आहे. आज जवळ जवळ चार वर्षे झाली एक गटर आहे. आणि घाणीच पाणी, संडासच आऊटलेट त्याच्यात जाते. एम.एम.आर.डी.ए.चे ते आऊटलेट त्याच्यात सोडलेले आहे. बाजूला सगळी वस्ती आहे. खांबित साहेबांकडे वारंवार त्याची विनंती केली की, साहेब हे काम लवकरात लवकर घ्या. साहेब मला तीन टर्म झाले ते काम अजून झालेले नाही. सुप्रभात चाळ, जय अंबे चाळीचे गटार ते काही होत नाही. त्याचे मला उत्तर द्या. काही अडचण असेल तर आम्हाला कळू द्या. आम्ही लोकापर्यंत पोहचू अशी अडचण आहे तर ते होऊ शकत नाही.

**दिपक खांबित :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. पहिल आपल उत्तर देतो आपण जे प्रस्तावित केले आहे नाल्यावर स्लॅब टाकायला पाहिजे तर त्या स्लॅबचा खर्च एक कोटीचा आहे. त्याचे इस्टीमेट तयार आहे. आता चालू वर्षामध्ये बजेट झालेले आहे. त्यामुळे आम्ही सगळ टोटल १०० नगरसेवकांनी जी काम दिलेली आहेत त्याची एकत्रितपणे इस्टिमेट काढणार आहोत. मग आपल्या बजेटप्रमाणे प्रस्ताव शिफारस करून..........

**रोहिदास पाटील :-**

त्या टिप्पणीमध्ये नीट लिहा, मच्छि मार्केट ते मटनाच लिहा. त्याठिकाणी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मराठी शाळेचे, हिंदी शाळेचे, लोकमान्यचे विद्यार्थी, एस.एन.कॉलेजचे आठ हजार विद्यार्थी आणि झोपडपट्टीत राहणारे २० हजार ते सुध्दा नागरीक आहेत. कोण राहूच शकत नाही. एवढी दुर्गंधी. तुम्ही व्हिजीट करा आणि अधिकृत आहे तर त्याला संमत्ती द्या.

**संभाजी पानपट्टे (मा.उपायुक्त) :-**

मा. सभापातीच्या परवानगीने बोलतो, टप्प्या-टप्प्याने सगळे नाले क्लोज करतो. तो पण विषय घेऊ. तरतूदचा विषय नाही. तरतूद कुठून उपलब्ध होते ते आपण बघू.

**दिपक खांबित :-**

मॅडम तूमचे पण इस्टीमेट तयार आहे कारण मागच्या वेळेला कमिश्नर आले होते. त्यांनी बघीतले आहे. आणि ते मंजुर करतील.

**अनिता पाटील :-**

तुम्हाला माहित आहे किती छोटे काम आहे करोडोचे काम नाही.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे १०० कोटींची इस्टीमेट आहेत. १०० नगरसेवकांचे आणि पैसे आहेत १० करोड रूपये.

**अनिता पाटील :-**

बरोबर आहे ते काम पण महत्वाचे आहे आणि छोटेस आहे तुम्हाला स्वतःला माहित आहे.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती साहेब मागे डॉ.साहेबांनी एक ठराव केलेला दोन करोड डायवर्ट केलेला तो कशाला वापरला तुम्ही सांगितले ते रोडसाठी वापरणार म्हणून तर त्याचे काय झाले.

**हंसुकुमार पांडे :-**

साफसफाई ठेवणे गरजेचे आहे. त्याच्यावर काय प्रतिबंध लावा ना. महानगरपालिकेच प्रतिबंध लावू शकते. त्यांना पकडल्यावर फाईन करा. १०० कोटींचे काम आहे. १०० नगरसेवकांचे पण जे प्रायोरिटीवर घ्यायचे ते प्रायोरिटीवर घेऊन करा ना.

**वंदना पाटील :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो. मागे डॉक्टर साहेबांनी दोन करोड डायवर्ट केले होते. त्यांनी सांगितलेले तुमच्या रोडसाठी वापरा. त्याचे काय झाले ते कुठे वापरले.

**राजेंद्र जैन :-**

मैने डायवर्ट नही किए थे। दो करोड का बजेट कट हुआ था। वह कहाँ डायवर्ट किया तो अधिकारी लोग बताएगे।

**मा. सभापती :-**

सगळ्याच्या कामासाठी कामाला येणार आहेत. आपको भी उसका फायदा होगा असे त्यांनी सांगितले.

**वंदना पाटील :-**

कुठे वापरले ते तरी सांगा.

**मा. सभापती :-**

वापरले कुठे ते बजेटमध्ये आहेत. ते कुठे कमी केले जास्त केले माहित नाही.

**राजेंद्र जैन :-**

आपका प्रश्न अधिकारी से रहेगा ना. वह पैसा कहाँ पर है वह बजेटवाले बताएगे।

**मा. सभापती :-**

ठीक आहे ते बजेटमध्ये घेतलेले आहेत. आपली काम द्या. खांबित साहेब बोलले ना १० करोडमध्ये १०० नगरसेकांची कामे करायची आहेत. सगळ्यांचे एक-एक काम घेतील ते.

**रोहिदास पाटील :-**

खांबित साहेब हे जे १ कोटीचे काम काढले आहे त्याची तरतूद गेल्यावर्षामध्ये की ह्या वर्षामध्ये २०१४-२०१५ मध्येच आहे ना.

**दिपक खांबित :-**

हो.

**रोहिदास पाटील :-**

मग त्याच्यासाठी पण २०१४-१५ मध्ये ते काम होत ना. मग ते काम घेतल असते तर काय झाल असत.

**दिपक खांबित :-**

हे काम मागच्या वेळेला काशिमिरा रोडला छत्रपति शिवाजी महाराज मार्गावर डिव्हायडरचे काम करायचे होते ना त्यावेळी ते काम स्टँडीगनी रद्द केले.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही नाही रद्द केले.

**दिपक खांबित :-**

त्यावेळेला त्याच्यामधून ही काम घेतली त्यावेळेला सुचना आली होती.

**रोहिदास पाटील :-**

काय सुचना आली होती.

**दिपक खांबित :-**

ह्या रकमेमधून दुसरी काम घ्या. त्यावेळेला ही काम घेतली.

**रोहिदास पाटील :-**

माझी विनंती ही होती की, ही जेव्हा काम घेतली ती मुलांच्या आरोग्याच्या दृष्टिने राहणारी लोक जगू शकत नाही. मग ते काम घ्यायला तुम्हाला काय अडचण होती.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे डेव्हलपमेंट चार्जेसचे पैसे येतात ते जवळ जवळ ३० ते ३५ कोटी येतात. तो जो पैसा आहे ना तो जिकडे नविन डेव्हलपमेंट होते त्या कामावरच खर्च करायला लागतो. गावामध्ये करता येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

अख्ख्या गावाची घाण घेऊन जाणारी गटारे..................

**दिपक खांबित :-**

म्हणजे डी.पी.रस्ते, रस्त्यावरची गटार ह्यावरती काम करावी लागतात.

**रोहिदास पाटील :-**

आता कशात बसवणार तुम्ही निवेदन करा. गटारावर स्लॅब टाकणे कशात बसणार त्याची तरतूद आहे का? नियमात आहे का?

**दिपक खांबित :-**

तरतूद सगळी रस्ते गटार १० कोटी आहे. काम १०० कोटींची आहेत. प्रशासन त्याच्यावर अभ्यास करून विषय देईल.

**हंसुकुमार पांडे :-**

जे काम गरजेचे आहे त्याला प्रायोरिटी द्यायला सांगा.

**राजेंद्र जैन :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ३१ मधील दिपक हॉस्पीटल रस्ता, हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल, आरक्षण क्र. २२१ पर्यत रस्ता तयार करणे कामांस मान्यता येऊन कार्यादेश आलेले आहेत. परंतु सदर रस्त्यावर यापुर्वी भुयारी गटार योजना व तदनंतर एका बाजुस नाला बांधणेचे काम सुरु आहे. नाला बांधण्याचे काम अपुर्ण अवस्थेत असून सदरचा विकास योजना रस्ता तयार करणे करीता एका बाजुस गटार बांधणे आवश्यक आहे. सदर रस्त्यावर हर्ष प्लाझा पासुन गटार बांधणे बाकी असून काम मंजुर नाही. गटाराचे काम केल्याशिवाय रस्ता तयार करणे उचित होणार नाही. रस्त्याच्या उतार गटाराकडे देऊन रस्ता तयार करणे व पावसाळयातील पाण्याचा निचरा होणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी गटार बांधणे कामी पाहणी करुन खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | कामाचे नावं | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता हर्ष प्लाझा ते आरक्षण क्र. २२१ पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे | रु. ३४,८७,८५०/- |
| २ | भाईदर (पुर्व) इंद्रलोक येथील आरक्षण क्र. २२१ ते रामदेव हाईटस् पर्यत एका बाजुस गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ३२,१२,५००/- |
| ३ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस – २ क्रिष्णा गीता ते आरक्षण क्र. २२१ ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३६,७१,४५०/- |

वरील कामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्रमांक ०५ :-**

विविध विकास कामांना प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्रमांक ०६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र. ३१ मधील दिपक हॉस्पीटल रस्ता, हर्ष प्लाझा ते ऑरेंज हॉस्पीटल, आरक्षण क्र. २२१ पर्यत रस्ता तयार करणे कामांस मान्यता येऊन कार्यादेश आलेले आहेत. परंतु सदर रस्त्यावर यापुर्वी भुयारी गटार योजना व तदनंतर एका बाजुस नाला बांधणेचे काम सुरु आहे. नाला बांधण्याचे काम अपुर्ण अवस्थेत असून सदरचा विकास योजना रस्ता तयार करणे करीता एका बाजुस गटार बांधणे आवश्यक आहे. सदर रस्त्यावर हर्ष प्लाझा पासुन गटार बांधणे बाकी असून काम मंजुर नाही. गटाराचे काम केल्याशिवाय रस्ता तयार करणे उचित होणार नाही. रस्त्याच्या उतार गटाराकडे देऊन रस्ता तयार करणे व पावसाळयातील पाण्याचा निचरा होणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी गटार बांधणे कामी पाहणी करुन खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | कामाचे नावं | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पुर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता हर्ष प्लाझा ते आरक्षण क्र. २२१ पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे | रु. ३४,८७,८५०/- |
| २ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक येथील आरक्षण क्र. २२१ ते रामदेव हाईटस् पर्यत एका बाजुस गटार बांधून स्लॅब टाकणे | रु. ३२,१२,५००/- |
| ३ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस – २ क्रिष्णा गीता ते आरक्षण क्र. २२१ ते ऑरेंज हॉस्पीटल पर्यत गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रु. ३६,७१,४५०/- |

वरील कामी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या "नविन गटारे/ नाले बांधकाम" या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे. तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**रोहिदास पाटील :-**

ह्यांनी काय मागितले आहे आम्ही कशाला मंजुरी द्यायची आहे.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो ह्याच्यामध्ये जी काम घेतलेली आहेत. दरवर्षी आपण टँकरची निविदा काढतो. त्यासाठी प्रशासकीय मंजुरी म्हणून स्थायी समितीची मंजुरी घेऊन काढतो. देखभाल दुरूस्तीसाठी मॅकेनिकेल फिटींग लागतात कुठली लाईन तुटली तर फिटींग ज्या आहेत तर त्याचे आपण एक वर्षाचे टेंडर करून ठेवतो. जशा लागतील तशा आपण घेत असतो. आणि ३० एम.एल.डी. पाणी आपण कापूरबावडीवरून उचलतो. त्याचा वार्षीक देखभाल दुरूस्ती त्याच्यासाठी आपण मंजुरी मागतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही चार महिन्यापूर्वी पण कापूरबावडी साठी मंजुरी घेतली ना.

**सुरेश वाकोडे :-**

कापूरबावडीसाठी मंजुरी घेतली नाही.

**रोहिदास पाटील :-**

कापूरबावडी आणि साकेतच्या पाईप लाईन आणि पंप दुरूस्ती करून त्याच्या देखभाली साठी नेमणूक करणे असा विषय होता. पाण्यासाठी ही सभा कोणालाही विरोध करणार नाही. कोणी करणार नाही. तुम्ही पैसे मंजुर करून घेत जायचे आणि आम्हाला पाणी द्यायचे नाही.

**सुरेश वाकोडे :-**

असे नाही.

**रोहिदास पाटील :-**

पाणी कुठे आहे. तीन वर्षामध्ये तुम्ही किती वेळा बोलतात. पाणी वाढते. पाणी वाढते. तीन वर्षापूर्वी जे पाणी दिल होत त्याच्यात एक लिटर देखील पाणी वाढले नाही. कोट्यावधी रूपयाची मंजुरी घेऊन गेलात.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब २० बिल्डींगची काम प्रगतीपथावर आहेत ती जून एन्ड पर्यंत सगळी काम होतील. परवा दिवशी आपण आला होतात. तेव्हा क्रॉस कनेक्शनची काम हाती घेतली होती. मिरा भाईंदर शहरामध्ये तीन ठिकाणी केली होती. ते ॲडीशनल पाणी येण्यासाठीच केले होते. ते क्रॉस कनेक्शन सुध्दा केलेल आहे. घोडबंदर रोडला लाईन सुध्दा टाकली आहे. एक महिन्याचा कालावधी आपला काही ठिकाणी गॅप पाडण्यासाठी लागेल. एक महिन्यामध्ये सुरू होणे अपेक्षित आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता तुम्ही आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेतली. आणि टँकरचे दर मग कधी ठरवणार.

**सुरेश वाकोडे :-**

आपण टेंडर काढणार. ही जी मंजुरी घेतो ना हे टेंडर काढण्यासाठी मंजुरी घेतो. टेंडर काढून हे स्टँडींग कमिटीसमोर येणार.

**रोहिदास पाटील :-**

खाली परत लिहिले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे नंबर २३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरूपात पाणी खात्यामध्ये तात्पुरता शब्द का येतो.

**सुरेश वाकोडे :-**

हा जो जलकुंभ आहे तो आपण सिव्हरेजच्या रिव्हसाठी बांधलेले आहे. पण सिव्हरेजचा रिव्ह पाणी घेण वगैरे त्याला विलंब लागतो. तर हे जर पाणी त्या जलकुंभात सर्व रेडी आहे. आणि तिथून पाणी घेण सुरू केल ना तो हटकेश भाग, शांतीविद्या नगरी, मंगल नगर हा जो परिसर आहे ज्या ठिकाणी एन्डमध्ये आहे ह्याच्यामधून कनकियाच्या टाक्या भरून पाणी जायला लागते. सगळ्यात शेवट आहे. त्याठिकाणी पाणी जात नाही. हा एक तात्पुरत्या स्वरूपचा घेतला म्हणजे कसे आहे की आपल्या जर प्रोजेक्टमध्ये आपण नविन इ.एस.आर. प्रस्तावित केलेला आहे. त्याच इ.एस.आर.च्या बाजूला पण हा आपल्याला आता यूजमध्ये आणता येईल. जे नुसतच स्ट्रक्चर बांधून ठेवलेल ते रियूजसाठी विलंब लागतो. हा पिण्याचा पाण्याचा प्रश्न त्या भागाचा सॉल्व्ह होईल.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब, एक तर वाटते सिव्हरेज ट्रिटमेंट प्लान्ट वाल्यांना मुदत दिलेली आहे. त्याचे काम लेट होते म्हणून पैसे आकारायला सुरूवात केली आहे. त्यांनी बनवलेल्या जलकुंभ पाण्यासाठी घेणार आणि ज्या दिवशी चालू होणार त्या दिवशी तुम्हाला देणारच नाही. त्या जलकुंभातून पाणी एकदा सुरू झाल तर आम्ही तुम्हाला सिव्हरेज ट्रीटमेंट प्लान्टला चालू करायला देणार नाही. तुम्हाला सिव्हरेज प्लान्ट दुसरा बनवायला लागेल. कारण हा जिव्हाळ्याचा प्रश्न होईल ना. एकदा या लोकांना पाणी द्यायला सुरूवात केली ती लोक थोडी थांबणार आहेत. पाणी बंद करा म्हणून ह्या दोन्ही गोष्टीचा विचार करून ठराव पास करा. आमचे म्हणणे ठाम राहील ह्या ठरावाला तुम्ही जोडणी केल्यानंतर पाणी चालू झाल आम्ही ते पाणी बंद करू देणार नाही. सिव्हरेज प्लान्टसाठी तुमचा जो प्रस्तावित केलेला आहे तो तुम्ही दुसरा बनवा. ह्यातून पिण्याच पाणीच वापरल जाईल ही आमची ह्या ठरावात टर्म्स कंडीशन आहे.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब हा जो इ.एस.आर. आहे हा सुर्या ट्रीटमेंट प्लान्ट मध्ये आहे. नविनच इ.एस.आर. आपण त्याच्याच बाजूलाच ३०-३५ मिटर अंतरावर रिझर्व्हेशन गार्डन आहे. तिथे प्रस्तावित आहे. आता इ.एस.आर. बनण्याचा आपला दोन वर्षाचा कालावधी जातो. आता इमिजिएट चालू केल्यावर लोकांचा मोठा प्रश्न सॉल्व्ह होईल.

**रोहिदास पाटील :-**

मी तेच सांगतो. इमिजिएट म्हणूनच केल आम्ही तुम्हाला धन्यवाद देतो. सगळ्या लोकांची सोय हाईल. पण ते बंद करणं शक्य नाही. आम्हाला लोकांना जवाब द्यायला लागेल की आपण ते मान्य केलेल आहे. ही लोक उद्या येऊन बंद करतील. स्टँडींगने मान्यता दिलेली आहे. आम्ही त्याला मान्यता देत नाही. चालू करायला देतो. बंद करायला मान्यता देणार नाही.

**सुरेश वाकोडे :-**

त्याठिकाणी पर्यायी दुसरा इ.एस.आर. मागवून त्यावेळेला ते करणार. पर्यायी दुसरा इ.एस.आर. बांधणे प्रस्तावित आहें.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब दोन्ही गोष्टी एकमेकांवर अवलंबून आहेत. तुम्हीच निवेदन करता दोन वर्ष होणार नाही. दोन वर्ष सिव्हरेज प्लान्ट चालू करणार नाही का?

**सुरेश वाकोडे :-**

सिव्हरेज प्लान्ट चालू करणार सगळ काही करणार..............

**रोहिदास पाटील :-**

सिव्हरेज प्लान्ट चालू करणार तुम्हाला इ.एस.आर. लागणारच ना.

**सुरेश वाकोडे :-**

इ.एस.आर. कशासाठी लागतो. पाणी रियूज करणार. मग त्या टाकीमध्ये ठेवणार. टाकीमधून पाईपलाईन गार्डनसाठी कनेक्शन द्यायचे असतील तर ती मानसिकता व्हायला वेळ लागेल. आता लोकांना पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. तो सॉल्व्ह होऊन जातो. आता त्याठिकाणी रियूजचा पाणी वापरायच असेल तर त्याठिकाणी पॉइन्ट करणार टँकरने भरून देणार. ज्यांना पाहिजे त्यांना देऊ शकू. हा एक त्यामध्ये पर्याय आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आमचे मत मांडलेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागात वार्षिक टँकर पुरवठा दर, जॉईट फिटींग्ज व पंपिंग स्टेशन देखभाल दुरूस्ती तसेच विकासकामे करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर कामाच्या वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे. तसेच महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. | ५०,००,०००/- |
| २ | पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईट व फिटींग्ज पुरवठा करणेकामी वार्षिक दर मागविणे. | ५०,००,०००/- |
| ३ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरूस्ती व चालविणे | ४२,९३,३००/- |
| ४ | अतिरीक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे गायमुख जकात नाका येथे मुख्य घोडबंदर रस्तामध्ये १६०० मि.मी. व्यासाची १८ मि.मी. जाडीची मृदू पोलादी पाईप एच.डी.डी. (HDD) पद्धतीने छेदून त्यामधून १३५० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी जलवाहिनी टाकणे. | ४९,८०,९३०/- |
| ५ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत येथील पंप गृहाकरीता मंजूर विद्युत जोडणी करणेकरीता ११ के.व्ही. फिडर बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ३६,९४,०००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्र. २३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरुपात पाणी वितरणाकरीता ५०० मि.मी. व्यासाची डी.आय.के-७ जलवाहीनी पुरविणे व अंथरणे | ४९,८४,८२०/- |

तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब ह्या शहरामध्ये रिसायकल करून पाणी वापराव असा आम्ही आग्रह करतो. ह्या सभागृहात येऊन दोन वर्ष पूर्ण व्हायला आली. त्याची प्रगती का? आम्ही तुम्हाला जेसल पार्कच्या प्लान्टमध्ये रिसायकल मिनी प्लान्ट लावा लोकांला ते घाणीच पाणी शुध्द केलेले बागेसाठी वापरता येईल. ते वापरू शकतो, पाण्याचा दर्जा, लोकांची मानसिकता तयार व्हावी असे आम्ही तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगितले. तुम्ही त्याच्यावर कोणताही निर्णय घेतला नाही. आता किती लोकांला पाणी कमी पडेल. हे त्रिवार सत्य आहे. रिसायकलींगचे करायचे आहे की नाही करायचे.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब करायचे आहे. जेसल पार्कसाठी २-३ एजन्सीला बोलावून कोटेशन घेऊन त्याचे प्रेझेन्टेशन घेऊन डिटेल घेऊ या.

**रोहिदास पाटील :-**

वाकोडे साहेब खोटे बोलू नका. मी तुम्हाला आनंदानं बोलतो. तुम्ही वेळ काढू नका. तुम्ही नक्की सांगा तुम्ही एजन्सी मागवली आहे कीं नाही मागवली.

**सुरेश वाकोडे :-**

एजन्सीकडे विचारणा केली आहे. त्यांना कोटेशन वगैरे मागवून घेतले कोटेशन मागवून बोलावून घेतो. त्याप्रमाणे डिटेल काढून सादर करतो.

**रोहिदास पाटील :-**

मी ३-४ दिवसांनी पुन्हा विचारेन. करणार नसाल तर तसे सांगा. आता दोन वर्षांनी तुम्ही सांगता आम्ही प्रोसेसमध्ये आहोत. इतकी वर्ष नाही नाही. तिकडचा प्लान्ट चालू होता असे सांगता. अस्तित्वात असलेले सिव्हरेजचे प्लान्ट किती चालू आहेत आणि किती बंद आहेत. ज्याचा तुम्ही टॅक्स घेता त्यातले सिव्हरेज प्लान्ट किती चालू आहेत.

**सुरेश वाकोडे :-**

शांती नगरचा चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही महापालिकेने ताब्यात घेतलेले किती सिव्हरेज प्लान्ट बंद आहे.

**सुरेश वाकोडे :-**

ताब्यात घेतलेले जेसल पार्क आहे. जेसल पार्कचा चालू आहे. सेकंडरी ट्रिटमेंटवर आहे. मॉरल टेक्नीकवर नाही. शांती नगरचा चालू झालेला आहे. शांती पार्कचा चालू आहे.

**राजेंद्र जैन :-**

वाकोडे साहेब हायकोर्टका कुछ डिसीजन आया क्या? जब तक एस.टी.पी. प्लान्ट चालू नही होगा तब तक आए सिव्हरेज चार्ज नही लगा सकते ऐसा कुछ हायकोर्ट का डिसीजन आया है क्या। विधी विभागसे पुछो ना। मेरे खयाल से ऐसा डिसीजन आया है। जिसमे हायकोर्ट ने रसिद किया है आप सिव्हरेज टॅक्स जब तक नही लगाना चाहिए की आपका सिव्हरेज वर्क चालू नही.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब तुमच्या कारकिर्दीत तो प्लान्ट चालू झाला पाहिजे, असे त्यांना सांगा.

**प्रकरण क्र. ०६ :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. ०७ :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागात वार्षिक टँकर पुरवठा दर, जॉईट फिटींग्ज व पंपिंग स्टेशन देखभाल दुरूस्ती तसेच विकासकामे करणेसाठी खालीलप्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. सदर कामाच्या वार्षिक निविदा मागविणे गरजेचे आहे. तसेच महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेव्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टॅकरचा प्रति फेरा दर निश्चित करणे. | ५०,००,०००/- |
| २ | पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईट व फिटींग्ज पुरवठा करणेकामी वार्षिक दर मागविणे. | ५०,००,०००/- |
| ३ | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ३० द.ल.लि. पाणी पुरवठ्यासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापूरबावडी) येथील पंपिंग स्टेशनच्या वार्षिक देखभाल, दुरूस्ती व चालविणे | ४२,९३,३००/- |
| ४ | अतिरीक्त २० द.ल.लि. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत ठाणे गायमुख जकात नाका येथे मुख्य घोडबंदर रस्तामध्ये १६०० मि.मी. व्यासाची १८ मि.मी. जाडीची मृदू पोलादी पाईप एच.डी.डी. (HDD) पद्धतीने छेदून त्यामधून १३५० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी जलवाहिनी टाकणे. | ४९,८०,९३०/- |
| ५ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी ने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत येथील पंप गृहाकरीता मंजूर विद्युत जोडणी करणेकरीता ११ के.व्ही. फिडर बसविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | ३६,९४,०००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर येथील सर्व्हे क्र. २३३ मधील उंच जलकुंभ तात्पुरत्या स्वरुपात पाणी वितरणाकरीता ५०० मि.मी. व्यासाची डी.आय.के-७ जलवाहीनी पुरविणे व अंथरणे | ४९,८४,८२०/- |

तरी वरील कामे अत्यावश्यक असल्याने उपरोक्त कामास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठेका वाहनचालक पुरवठा करणे कामाच्या नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (वाहन विभाग)

**राजेंद्र जैन :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात (उदा.सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग इ) अत्यावश्यक विभागात मनपाच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक नेमणेकामी जा.क्र/मनपा/वाहन/१८/२०१३-१४,दि.३०/०४/२०१३ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यांत आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि.२९/०४/२०१४ रोजी संपलेली आहे. लोकसभेची सार्वत्रिक निवडणुक २०१४ कामी आचारसंहिता लागू झाल्याने नवीन निविदा काढणे शक्य झाले नाही. सन २०१४-१५ अर्थसंकल्पात अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षातंर्गत रु.३५,००,०००/- इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे. सदर तरतुदीतुन ठेका वाहन चालक पुरवठा करणेकामी येणारा खर्च भागविणेत येणार आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागातील अत्यावश्यक सेवा तसेच इतर विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी वार्षिक निविदा मागविणेस ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ठेका वाहनचालक पुरवठा करणेकामाच्या नवीन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागात (उदा.सामान्य प्रशासन विभाग, आरोग्य विभाग, वैद्यकीय आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग इ) अत्यावश्यक विभागात मनपाच्या वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक नेमणेकामी जा.क्र/मनपा/वाहन/१८/२०१३-१४,दि.३०/०४/२०१३ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यांत आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि.२९/०४/२०१४ रोजी संपलेली आहे. लोकसभेची सार्वत्रिक निवडणुक २०१४ कामी आचारसंहिता लागू झाल्याने नवीन निविदा काढणे शक्य झाले नाही.

सन २०१४-१५ अर्थसंकल्पात अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षातंर्गत रु.३५,००,०००/- इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे. सदर तरतुदीतुन ठेका वाहन चालक पुरवठा करणेकामी येणारा खर्च भागविणेत येणार आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागातील अत्यावश्यक सेवा तसेच इतर विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेकामी वार्षिक निविदा मागविणेस ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प येथे कचरा हवारी करणे, आगीवर माती पसरविणे आदी कामी भाड्याने पोकलन, जेसीबी, चेनड्रोसर, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती टाकणे इ. कामाची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात सद्यस्थितीत कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम पुर्णपणे बंद आहे. त्यामुळे शहरातील दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निघणारा सुमारे ४०० ते ४५० मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करून प्रकल्पाच्या लगत मोकळ्या जागेत टाकून पोकलन मशिन मार्फत हवारी करण्यात येत आहे. सदरची जागा ही डोंगराळ भागाची व कमी असल्याने दैनंदिन येणारा घनकचरा दररोज उंचावर नेऊन डंम्प करण्यात येत आहे. या कामी दररोज तीन ते चार पोकलन मशिन चालवून घनकचऱ्याची विल्हेवाट वेळीच लावणेत येत असुन याकामी प्रतीमाही नऊ ते दहा लक्ष खर्च अपेक्षित आहे. शहरातील दैनंदिन साफसफाई कामातुन जमा होणा-या कचऱ्यामध्ये औद्योगिक क्षेत्रातील कचरा मिक्स असून केमिकल मिश्रीत असल्याने उष्णतेने कचऱ्याला आग लागून धुर होवून आजुबाजूच्या गावातील रहिवाश्यांना गैरसोय होत असते. अशावेळी आगीवर माती टाकून पोकलन मशिनमार्फत पसरवून आग नियंत्रणात आणण्याकामी

आवश्यकतेनुसार तातडीने माती मागविणे येते. शहरातुन दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निर्माण होणाऱ्या घनकच-याची विल्हेवाट वेळीचं लावण्याच्या दृष्टीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वरील प्रमाणे कराव्या लागणा-या तसेच साफसफाई ही अत्यावश्यक सेवेत येत असल्याने, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी टाकण्यात येणारा दैनंदिन कचरा हवारी करणे करिता आवश्यक लागणारी पोकलन,चेनडोझर,जे.सी.बी.मशिन, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती पुरवठा करणे कामाच्या निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ५० लक्ष खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प येथे कचरा हवारी करणे, आगीवर माती पसरविणे आदी कामी भाड्याने पोकलन,जे.सी.बी.,चेनड्रोझर,डंपर,टोरस भाड्याने घेणे व माती टाकणे इ. कामाची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणे.

**ठराव क्र. ०९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मौजे उत्तन येथील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पात सद्यस्थितीत कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम पुर्णपणे बंद आहे. त्यामुळे शहरातील दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निघणारा सुमारे ४०० ते ४५० मेट्रीक टन घनकचरा वाहतुक करून प्रकल्पाच्या लगत मोकळ्या जागेत टाकून पोकलन मशिन मार्फत हवारी करण्यात येत आहे. सदरची जागा ही डोंगराळ भागाची व कमी असल्याने दैनंदिन येणारा घनकचरा दररोज उंचावर नेऊन डंम्प करण्यात येत आहे. या कामी दररोज तीन ते चार पोकलन मशिन चालवून घनकचऱ्याची विल्हेवाट वेळीच लावणेत येत असुन याकामी प्रतीमाही नऊ ते दहा लक्ष खर्च अपेक्षित आहे.

शहरातील दैनंदिन साफसफाई कामातुन जमा होणा-या कचऱ्यामध्ये औद्योगिक क्षेत्रातील कचरा मिक्स असून केमिकल मिश्रीत असल्याने उष्णतेने कचऱ्याला आग लागून धुर होवून आजुबाजूच्या गावातील रहिवाश्यांना गैरसोय होत असते. अशावेळी आगीवर माती टाकून पोकलन मशिनमार्फत पसरवून आग नियंत्रणात आणण्याकामी आवश्यकतेनुसार तातडीने माती मागविणेत येते.

शहरातुन दैनंदिन साफसफाई विषयक कामातून निर्माण होणाऱ्या घनकच-याची विल्हेवाट वेळीच लावण्याच्या दृष्टीने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी वरील प्रमाणे कराव्या लागणा-या तसेच साफसफाई ही अत्यावश्यक सेवेत येत असल्याने, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता घनकचरा प्रक्रिया प्रकल्प ठिकाणी टाकण्यात येणारा दैनंदिन कचरा हवारी करणे करिता आवश्यक लागणारी पोकलन, चेनडोझर,जे.सी.बी.मशिन, डंपर, टोरस भाड्याने घेणे व माती पुरवठा करणे कामाच्या निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या रु. ५० लक्ष खर्चास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरीता ठेका पध्दतीने स्त्री/पुरुष मजूर पुरवठा करणेकामी वार्षिक निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**राजेंद्र जैन :-**

मिरा भाईदर महानगरपालिका उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागातील विविध कामाकरीता ठेका पध्दतीने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजूर पुरवठा करणेकामी मा वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र.१२ दि. २३/०५/२०१३ अन्वये मंजुरी घेऊन दि. १६/०६/२०१३ रोजी दै. दि फ्री प्रेस जर्नल, दै. नवाकाळ व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे जाहीर निविदा प्रसिध्द करून ठेका पध्दतीने मजुर घेण्याकामी दि.१७/०६/२०१३ ते२७/०६/२०१३ रोजी या कालावधीकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती, परंतु सदर कालावधीत दोंनच निविदा प्राप्त झाल्यामुळे कमीत कमी तीन निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर निविदेस दि.०१/०७/२०१३ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर कंपन्या निविदेतील अटीशर्तीच्या पुर्तता करित नसल्यामुळे मा. आयुक्त सो. यांनी दि. १८/०७/२०१३ रोजी फेर निविदा मागविण्यास मंजूरी दिली. त्यानुसार दि.२५/०७/२०१३ रोजी दै. नवभारत व दै. मिड डे या वृतपत्रात व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे दि. २५/०७/२०१३ ते दि. ०३/०८/२०१३ या कालावधीकरीता जाहिर फेर निविदा (प्रथम) प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेची अंतीम मुदत दि. ०३/०८/२०१३ रोजी पर्यत होती. सदर कंपन्या निविदेतील अटीशर्तीच्या पुर्तता करीत नसल्यामुळे मा. आयुक्त

सो.यांनी दि. २०/०१/२०१४ रोजी फेर निविदा मागविण्यास मंजुरी दिली. त्यानुसार दि. २४/०१/२०१४ रोजी दै. नवभारत व दै. मिड डे या वृतपत्रात व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे जाहिर फेरनिविदा (द्वितीय) मागविण्यात आल्या होत्या सदर निविदेची मुदत दि. ०५/०२/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार दि. २८/०१/२०१४ ते दि. ०५/०२/२०१४ या कालावधीत एकूण चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) मे.स्ट्रार कन्स्ट्रक्शन,
२) मे.कमल इंटरप्रायईजेस,
३) मे.जय श्रीकृष्ण ट्रान्सपोर्ट
४) सैनिक इंटलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि.

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या सन २०१३-१४ अर्थसंकल्पात "मजुर पुरवठा" या लेखाशिर्षाखाली रु. २.२५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. ठेका मजूर पुरवठा निविदेस योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने व निविदेची मुदत दि. ०६/०७/२०१३ रोजी संपत असल्याने मा. स्थायी समिति ठराव क्र. ३९ दि. ०६/०७/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या दरानुसार सन २०१३-१४ करीता ठेका पध्दतीने मजूर पूरवठा करणे कामाचे निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याकरीता विलंब लक्षात घेता मा. आयुक्त सो. यांच्या दि. ४/७/२०१३ रोजीच्या मान्यतेने प्रथम एक महिन्या करिता मुदत वाढ देण्यात आली होती. तसेच मा. आयुक्त सो. यांच्या दि. ३/८/२०१३ रोजीच्या मान्यतेने पूनश्च एक महिन्याकरिता द्वितिय मुदत वाढ देण्यात आली आहे. उपरोक्त कालावधित निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने मा.आयुक्त सो यांनी पूनश्चः दि.६/९/२०१३ पासून निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यत निविदाकारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. उपरोक्त मजुर पुरवठा करणेकामी देण्यात आलेल्या मूदत वाढीचे अवलोकन होण्यास विनंती आहे. वर नमुद ०४ प्राप्त निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन त्यांची Technical Bid तपासणी बाबत दि.१२/०२/२०१४ रोजी सदरची नस्ती मा. निविदा समिती यांचेकडे सादर करण्यात आली होती. त्यावेळेस निविदा समितीच्या बैठकीमध्ये मे. स्टार कन्स्ट्रक्शन व मे. जय श्री कृष्ण ट्रान्सपोर्ट यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांच्या अनुभव दाखल्याबाबत आक्षेप घेतल्याने मा. निविदा समितीने सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांनी दाखल केलेल्या अनुभव दाखल्याबाबत मा. विधी अधिकारी यांचे अभिप्राय घेणेबाबत विनंती केली. त्यानुसार विधी अधिकारी यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचा अनुभव दाखला विचारात घेणेबाबत अभिप्राय दिले व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २०/०२/२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि. २१/०२/२०१४ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता/विवरण पत्र तपशिल खालील प्रमाणे आहे.

| No. | Entity Description | STAR CANSTRUCI ON | JAI SHREE KRISHNA TRANSPORT | SAINIK INTELLIGENCE & SECURITY PVT.LTD |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of labour on contract basis according to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction.<br>(Period - 1 year)<br>Date 01st January 2014 to 30st June 2014. | Rs. 409.50/- | Rs. 416/- | Rs. 441/- |
| 2. | Supply of labour on contract basis according to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction.<br>(Period - 1 year)<br>Date 01st July 2014 to 31st December 2014. | Rs. 423/- | Rs. 423.57/- | Rs. 471/- |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे मे. स्टार कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची वार्षिक निविदा स्विकारण्यास मा. निविदा समितीने दि. २४/०२/२०१४ रोजी शिफारस केलेली आहे व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २४/०२/२०१४ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर निविदाधारकाने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरांना दरमहा वेतन देणे बंधनकारक आहे व तसेच इतर सर्व प्रकारचे कर भरण्याची/अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची असणार आहे. मा. वृक्ष प्राधिकरण समितीने पारित केलेल्या ठरावामध्ये सन २०१४-१५ या वर्षाकरीता अर्थसंकल्पात "मजूर पुरवठा" या लेखाशिर्षाखाली रु. २.२५ कोटी तरतूद करण्यात आली आहे. तरी प्रभाग समिती क्र. १,२,३ करीता १०५ मजूर व प्रभाग समिती क्र ४,५,६ करीता १०५ मजूर याप्रमाणे एकुण २१० मजुर पूरवठा करणेस व महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार दर सहा महिन्यांनी वेतनाचे दर बदलत असल्यामुळे बदलत्या दराप्रमाणे मजुरांना किमान वेतन अदा करण्याचे खर्चास मा. स्थायी समिती सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

मिरा भाईदर मध्ये टोटल किती गार्डन आहेत. २०१३-१४ मध्ये किती होते आणि २०१४-१५ मध्ये वाढले का?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, २०१३-१४ मध्ये एकूण ४९ उद्याने होती. त्याच्यात ८ उद्यानाची वाढ झालेली आहे. सध्या ५७ उद्याने आहेत. ८ उद्याने डेव्हलप केली त्याच्यात शिवसेना गल्ली उद्यान आरक्षण १००,१११, सेक्टर ११-बी-२१ मिरा रोड सेक्टर ४,६,७ आणि पूनम फेज ३ एवढ्या आठ उद्यानाची वाढ झालेली आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

उद्यानासाठी पहिला किती फंड उपलब्ध होता. आणि किती मंजुर उपलब्ध होते.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

११० होते. परंतु जेव्हा ही उद्यान ४९ होती तेव्हा ११० होती. आता जास्तच लागणार आहेत. अजूल ५-६ ठिकाणी काम सुरू आहे.

**हंसुकूमार पांडे :-**

साहेब आमच्या प्रभाग ३ मध्ये चौपाटीवर तिथे पण मजुर दिसतच नाही फक्त पाणी मारायला गाडी येते. नंतर कोण दिसतच नाही. कधी झाड कापायला येते, गार्डनची लेव्हल करायला..............

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

रस्त्यावरची झाड आहेत ती कापण्यासाठी..............

**हंसुकुमार पांडे :-**

रस्त्यावरची नाही. चौपाटीवर गार्डन बनवले त्या गार्डनचे.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आपण प्रत्येक ठिकाणी रोजच्या रोज मस्टर मेन्टेन केलेला आहे. की कोणता व्यक्ती त्या दिवशी जो व्यक्ती हजर होता. एका मजुरामध्ये तो व्यक्ती आज त्या दिवशी तो कोणत्या उद्यानामध्ये ..............

**हंसुकुमार पांडे :-**

दिवसाला किती मजुर आहेत.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

रजिस्टर बघितल्याशिवाय मला सांगता येणार नाही.

**अनिता पाटील :-**

कुरळेकर साहेब, तुमच्या लक्षात असेल मागे मी सांगितलेले पेणकरपाडा गार्डनची अवस्था बघा. तुम्ही मला वेळ पण दिलात. पण तुम्ही आलात नाही. तुम्ही बिझी असाल पण तुमचा कोणी प्रतिनिधी तरी यायला पाहिजे. कारण आपण गार्डन विकसीत करतो तर त्याची देखभाल किंवा ते व्यवस्थित आहे की नाही हे सुध्दा बघण्याची जबाबदारी आहेच ना, की लोकांचा टॅक्स येतो. तो पैसा कुठेही, कसाही वापरायचा. गार्डन म्हणून विकसीत करायचे आणि पुन्हा तिथे खंडहर करून टाकायचे असे तर नाही ना. जशी आमची जबाबदारी तशी तुमचीही आहेच ना. जेव्हा निविदा काढता त्याला परवानगीसाठी येता मग हे देखभाल कोणी करायचे. एखादा नगरसेवक बोलवत असेल तिकडची परिस्थिती बघा तर तुम्हाला वेळच नसतो.

**मुन्ना सिंग :-**

मा. सभापती साहेब नर्मदा महादेव गार्डन बनाया, उसमे जो झाड लगाया यह सब सुख गया। उधर हप्ते में एक बार पाणी डालने को आते है। ६ दिन रामभरोसे चालू। एक वॉचमन दिया है, कमसे कम वह झाड अच्छा है। वॉचमन बैठा रहता है, वह मख्खी नही भगा पाता। इतना मजबूत वॉचमन है।

**मा. सभापती :-**

कुरळेकर साहेब तुम्ही सांगता आम्हांला माणसे वाढवून द्या. तुमची माणस असतात तीच कामाला नसतात. सगळ्याच नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. करायचे काय?

**अनिता पाटील :-**

मा. सभापती साहेब माझ्या वॉर्डात दफन भूमीसाठी मातीची भरणी केली आहे. ती भरणी मी मेश्राम साहेबांना लेवल करण्यासाठी जवळ जवळ १० वेळा सांगितले असेल. अजून त्याला हात लावला नाही. जशी माती टाकली तशीच आहे. साहेब आमच्याकडे तेली समाज आहे. त्या समाजात घरातल कोण वारलं तर त्यांना बसून पुरतात म्हणून माती जास्त लागते. संबंधित डिपार्टमेंटला सांगून केले नाही. आमच्या लेवलला आम्ही ती भरणी करून टाकली की वॉर्डातल्या लोकांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही ते केल. परंतू त्या भरणीची लेवलींग सुध्दा ह्या लोकांनी केले नाही. त्याच्यावर वारंवार पाठपुरावा केलेला आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती साहेब मेरा एक देढ महिने से ७-८ लेटर कुरळेकर साहब के पास प्रलंबित है। वारंवार फॉलोअप किया। मैं खुद दो बार गया एक बार कुरळेकर साहब मिले। तो हालत कैसे थी उनके पास आदमी नही टाईपरायटर कोई करनेवाला नही। साहब बोले यह कागज यहाँ नही नगरभवन मे, मैने बोला आज तो आपको करना ही है। मेरे साथ मेरे गाडी में नगरभवन लेके गया। वहाँ पे भी सन्नाटा था। मैंने उनको बोला उधर टाईप

करनेवाला है क्या, चेक करो यहाँ से अपने आदमी को साथ लेके चलो। यहाँ से कॉम्प्युटर ऑपरेटर को साथ में लेके गये। नगरभवन गए वहाँ गये तो ताला लगा खुला हुआ। इरकर साहब बैठे थे उधर चपरासी भी नही था। नगर भवन मे भी कागज नही, डुप्लीकेट लिखके सारा काम किया। कुरळेकर साहबको बोला यह क्या व्यवस्था है। सव्वा दो करोड का बजेट यहाँ पे इतने शक्तीशाली लगते है। वहाँ हमको निसहाय्य लगते है। अभी भी काम पेन्डींग पडे है। एक भी काम पक्का होके आया नही। बाद में उनका जवाब क्या आता है। जब अधिकारी बोलता है साहब मेरे पास आदमी नही है मैं क्या करू। तो क्या करे खा जाए आदमी को। तो पहले यह व्यवस्था करो। कम से कम आदमी दो।

**मिरादेवी यादव :-**

मा. सभापती साहब, काशिमिरा जरिमरी तलाव के बाजू में गार्डन है। वहाँ भी एक वॉचमन है। वह २४ घंटे के लिए रखा है। वहाँ कोई साधारण आदमी बैठ नही सकता। २-३ बार उसको मारा वह लोग खाते पीते है। वही बॉटल से उसको मारा कितनी बार कम्प्लेट आया लेकीन कोई ध्यान नही दिया।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, कुरळेकर साहेब आज चर्चा करून ताबडतोब कॉम्प्युटर ऑपरेटर लगेच आजच्या आज देऊन टाकू.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, कुरळेकर साहेब ऐकून घ्या, मातीचा भराव तुमच्या अखत्यारित आहे की सार्वजनिक बांधकाम विभाग करते.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

माती पुरवठा निविदा उद्यान विभागाने केली आहे. त्यानुसार कार्यादेश देतो. इस्टीमेट आहे ते पी.डब्ल्यु.डी. देते.

**रोहिदास पाटील :-**

इस्टीमेट काय वर्ष दोन वर्ष होत आली. ज्यावेळी आपण चौपाटीवर रेल्वेकडे आपण परवानगी द्यायला सुरूवात केली. लोक कार्यक्रम करायला लागले, भागवत सप्ताह होतो तो आठ दिवसाचा होतो. आठ दिवसाच्या भागवत सप्ताहामध्ये आयोजकांना लक्षात येत नाही. म्हणजे भरती ओहोटी लक्षात येत नाही. ठेकेदाराला ठेका दिला जातो. मंडप पूर्ण तयार होतो. ठेकेदार संपूर्ण कारपेट टाकून देतो. खुर्च्या लागतात. सप्ताह चालू होतो. भरती येते. लोकांची पळापळ होते. कारपेट भिजून जाते. आपण ह्यांना विनंती केली चौपाटीवर ज्या ठिकाणी पाणी येते त्याठिकाणी जिकडे ६ इंच आहे, कुठे १ फुट आहे. तिथे लेवल टाका. आमच्या माहिती प्रमाणे माती फुकट मिळते. ती पण नाही आणि विकत पण नाही. तुम्हाला मंजुरी दिली आहे की नाही फुकट टाका विकत टाका तो विषय वेगळा. पण ती माती पडत नाही ना. रेल्वे ट्रॅकच्या मैदानामध्ये भरतीचे पाणी आल्यावर ते सगळ कारपेट भिजते. मध्ये भागवत चालू असताना पाणी येते किती वेळा सांगून झालं. उद्यापासून चालू कराल. कोणाला तरी सांगा चांगलं काम आहे. त्यांनी माती टाकून लेवल करायचा आहे. परत भरती आल्यावर पाणी वरती येणार नाही.

**मा. सभापती :-**

कुरळेकर साहेब ह्या जेवढ्यांनी तक्रारी केल्या आहेत ना त्याच्यात असत्यता नाही. मी तुम्हाला आतापण सांगतो आमच्याकडे एकमेव गार्डन आहे. तिथे एकसुध्दा माणूस नसतो. त्याची हजेरी कोण घेते ते सांगा?

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

सकाळी ७.०० वा. नगरभवनला दुपारी ३.०० वा. नगरभवनला आणि मिरारोडला प्रभाग समिती कार्यालयात सकाळी ७.०० आणि दुपारी ३.०० वाजता.

**मा. सभापती :-**

ठीक आहे, ही हजेरी तुम्ही नगरभवनला घेता पण त्याच्यावर वॉच ठेवायला तुमच्या व्यतिरीक्त कोण आहे का? की हजेरी घेतल्यावर ते कामाला जातात की घरी जातात. ७.०० वाजता हजेरी घेतल्यावर ते घरी निघून जातील आणि ३.०० वाजता पुन्हा येतील ह्याच्यावर कोण लक्ष देते.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आपले काही नेमलेले मुकादम आहेत. मुकादम उपस्थिती घेतात त्या अनुषंगाने आपल्या महानगरपालिकेच्या वाहनाने त्यांना विविध ठिकाणी सोडले जाते.

**मा. सभापती :-**

सगळ्यांच्या तक्रारी आहेत. त्यांच्या गार्डनमध्ये लोकच नाहीत. तुम्हाला माणसं वाढवून पाहिजेत तर कशासाठी द्यायची. तुमचे म्हणणे काय आहे ते मांडा. माणसं का वाढवून पाहिजेत कशासाठी पाहिजेत.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आपण जी नविन ८ उद्यान डेव्हलप केलेली आहेत. आणखी ५-६ उद्यानाचे सपाटीकरण वगैरे करतो. त्याठिकाणी देखील आपल्याला माणसाची गरज भासणार आहे. ३-४ माणसं तरी एका ठिकाणी म्हटल तरी ४० माणसाची आवश्यकता या विभागाला आहे. जून मध्ये नविन आरक्षणामध्ये झाड लावायला सुरूवात करू तर त्याठिकाणी माणसाची आवश्यकता भासणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाला माहिती द्या की, ह्या मिरा भाईंदरमध्ये इतकी उद्याने आहेत त्याच्यातली दोन ही आदर्श उद्यान ती सर्व सभागृहाने जाऊन बघावी इतर पाहूण्याना बोलावून दाखवावी अशी दोन उद्यानाची नावं सांगा.

**मुन्नासिंग :-**

मा.सभापती साहेब मेरे वॉर्ड में नर्मदा महादेव गार्डन उसको भी लाके दिखाए। एक भी झाड नही।

**अनिता पाटील :-**

पेणकरपाड्याच्या गार्डनची परिस्थिती बघाल तर एकदम खराब झालेली आहे. पेणकरपाड्याच गार्डन एकदम चांगलं होत. तिकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्या गार्डनची दुरावस्था झाली आहे.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

ज्या ज्या गार्डनचे सन्मा.नगरसेवकांनी मुद्दे उपस्थित केले आहेत तिकडे मी ह्या आठवड्यात प्रत्यक्ष भेट देतो. आणि त्याच्यावर काय कारवाई झाली त्याचा रिपोर्ट देतो.

**मा. सभापती :-**

आता सगळ्यांनी सांगितले की, गार्डनमध्ये माणसच नाहीत तर आपल्याला माणस कशाला पाहिजेत.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आता नविन जी ८ उद्यान विकसीत केलेली आहेत आणि एक मैदान विकसीत केलेल आहे. ५-६ आरक्षणाचे काम सुरू केले आहे. तिथे सुध्दा माणसाची आवश्यकता भासणार आहे. ४० माणसाची आवश्यकता भासणार आहे. इकडची माणस कमी केली तर इकडेही होणार नाही आणि तिकडेही होणार नाही. असा आमचा मुद्दा आहे. १९० मध्ये अजुन ४० माणस भासणार आहेत. २३० माणस आपल्याला लागतील.

**रोहिदास पाटील :-**

माणस नाहीच दिली तर काय होईल.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

माणस नाही दिली तर झाडांना पाणी वगैरे टाकणे.........

**रोहिदास पाटील :-**

सगळी झाडं मरतील.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

मोठी झाडं जगतील. परंतू नविन प्लान्टेशन आपण करणार आहोत ती झाड जगणार नाहीत त्यांना पाणी देणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता किती आहे.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

आता १९० आहेत.

**रोहिदास पाटील :-**

१९० असल्यानंतर काय परिणाम आणि त्याच्यात २० वाढवली तर काय परिणाम २० पाहिजेत ना म्हणजे २१०.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

८ उद्यान डेव्हलप केलेली आहेत. ५-६ उद्यान विकसीत करतो. जवळपास १४-१५ उद्यान विकसीत करतो. एका ठिकाणी ३-३ माणस ठेवली तर ४५ होतात ४० तरी पाहिजेत.

**रोहिदास पाटील :-**

४० पेक्षा जास्त मागा ना.

**मा. सभापती :-**

४० नाही.

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी मागितली आहेत तर १०-२० वाढवा.

**मा. सभापती :-**

२० वाढवतो ना.

**हंसुकुमार पांडे :-**

२० माणसं वाढवा. पण आपले काम झाले पाहिजे.

**मा. सभापती :-**

अशा जर तक्रारी आल्यावर तर तुमची हजेरी आम्ही घेऊ. आम्ही चेकींगला जाणार. तुमची कुठेकुठे माणसं आहेत बघायला.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय ह्याच्यात आपण २० मजूर वाढवतो. उद्या तुम्ही माझ्या ग्राऊंडवर येणार आहेत. उद्यानाची पाहणी करणार आहेत. मेश्राम साहेब तुम्ही बरोबर आहेत ना. बाकी सन्मा.सदस्यांच्या ज्या काही

कम्प्लेंट होत्या त्या सगळ्याच्या सुचना गृहीत धरून आपण त्यांचा मजूर पुरवठा २० ने वाढवा अशी मी सुचना मांडतो.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास ठेका पध्दतीने स्त्री/ पुरूष मजूर पुरवठा करणेकामी वार्षिक निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

मिरा भाईदर महानगरपालिका उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागातील विविध कामाकरीता ठेका पध्दतीने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजूर पुरवठा करणेकामी मा वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र.१२ दि. २३/०५/२०१३ अन्वये मंजुरी घेऊन दि. १६/०६/२०१३ रोजी दै. दि फ्री प्रेस जर्नल, दै. नवाकाळ व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे जाहीर निविदा प्रसिध्द करून ठेका पध्दतीने मजुर घेण्याकामी दि.१७/०६/२०१३ ते२७/०६/२०१३ रोजी या कालावधीकरीता निविदा प्रसिध्द करण्यात आली होती, परंतु सदर कालावधीत दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे कमीत कमी तीन निविदा प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर निविदेस दि.०१/०७/२०१३ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर कंपन्या निविदेतील अटीशर्तीच्या पुर्तता करित नसल्यामुळे मा. आयुक्त सो. यांनी दि. १८/०७/२०१३ रोजी फेर निविदा मागविण्यास मंजूरी दिली.

त्यानुसार दि.२५/०७/२०१३ रोजी दै. नवभारत व दै. मिड डे या वृतपत्रात व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे दि. २५/०७/२०१३ ते दि. ०३/०८/२०१३ या कालावधीकरीता जाहिर फेर निविदा (प्रथम) प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदेची अंतीम मुदत दि. ०३/०८/२०१३ रोजी पर्यत होती. सदर कंपन्या निविदेतील अटीशर्तीच्या पुर्तता करीत नसल्यामुळे मा. आयुक्त सो. यांनी दि. २०/०१/२०१४ रोजी फेर निविदा मागविण्यास मंजुरी दिली.

त्यानुसार दि. २४/०१/२०१४ रोजी दै. नवभारत व दै. मिड डे या वृतपत्रात व ई-टेंडरींग (E-Tendering) प्रणालीद्वारे जाहिर फेरनिविदा (द्वितीय) मागविण्यात आल्या होत्या सदर निविदेची मुदत दि. ०५/०२/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत होती. त्यानुसार दि. २८/०१/२०१४ ते दि. ०५/०२/२०१४ या कालावधीत एकूण चार निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) मे.स्ट्रार कन्स्ट्रक्शन,
२) मे.कमल इंटरप्रायईजेस,
३) मे.जय श्रीकृष्ण ट्रान्सपोर्ट
४) सैनिक इंटलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि.

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाच्या सन २०१३-१४ अर्थसंकल्पात "मजुर पुरवठा" या लेखाशिर्षाखाली रु. २.२५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे. ठेका मजूर पुरवठा निविदेस योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने व निविदेची मुदत दि. ०६/०७/२०१३ रोजी संपत असल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ३९ दि. ०६/०७/२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या दरानुसार सन २०१३-१४ करीता ठेका पध्दतीने मजूर पूरवठा करणे कामाचे निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याकरीता विलंब लक्षात घेता मा. आयुक्त सो. यांच्या दि. ४/७/२०१३ रोजीच्या मान्यतेने प्रथम एक महिन्या करिता मुदत वाढ देण्यात आली होती. तसेच मा. आयुक्त सो. यांच्या दि. ३/८/२०१३ रोजीच्या मान्यतेने पूनश्च एक महिन्याकरिता द्वितिय मुदत वाढ देण्यात आली आहे. उपरोक्त कालावधित निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने मा.आयुक्त सो यांनी पूनश्चः दि.६/९/२०१३ पासून निविदा प्रक्रिया पूर्ण होई पर्यत निविदाकारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. उपरोक्त मजुर पुरवठा करणेकामी देण्यात आलेल्या मूदत वाढीचे अवलोकन होण्यास विनंती आहे.

वर नमुद ०४ प्राप्त निविदा विहित मुदतीत व तांत्रीक दृष्टया प्राप्त झाल्या असुन त्यांची Technical Bid तपासणी बाबत दि.१२/०२/२०१४ रोजी सदरची नस्ती मा. निविदा समिती यांचेकडे सादर करण्यात आली होती. त्यावेळेस निविदा समितीच्या बैठकीमध्ये मे. स्टार कन्स्ट्रक्शन व मे. जय श्री कृष्ण ट्रान्सपोर्ट यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांच्या अनुभव दाखल्याबाबत आक्षेप घेतल्याने मा. निविदा समितीने सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांनी दाखल केलेल्या अनुभव दाखल्याबाबत मा. विधी अधिकारी यांचे अभिप्राय घेणेबाबत विनंती केली. त्यानुसार विधी अधिकारी यांनी सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांचा अनुभव दाखला विचारात घेणेबाबत अभिप्राय दिले व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २०/०२/२०१४ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार दि. २१/०२/२०१४ रोजी सदर निविदेचे Financial Bid उघडून तुलनात्मक तक्ता/विवरण पत्र तपशिल खालील प्रमाणे आहे.

| No. | Entity Description | STAR CANSTRUCT ION | JAI SHREE KRISHNA TRANSPORT | SAINIK INTELLIGENCE & SECURITY PVT.LTD |
|---|---|---|---|---|
| 1. | Supply of labour on contract basis according | Rs. 409.50/- | Rs. 416/- | Rs. 441/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction.<br>(Period - 1 year)<br>Date 01st January 2014 to 30st June 2014. | | | |
| 2. | Supply of labour on contract basis according to Minimum Wages Act for Garden and Tree Authority Department in MBMC jurisdiction.<br>(Period - 1 year)<br>Date 01st July 2014 to 31st December 2014. | Rs. 423/- | Rs. 423.57/- | Rs. 471/- |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद प्रमाणे मे. स्टार कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची वार्षिक निविदा स्विकारण्यास मा. निविदा समितीने दि. २४/०२/२०१४ रोजी शिफारस केलेली आहे व त्यास मा. आयुक्त सो. यांनी दि. २४/०२/२०१४ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदर निविदाधारकाने किमान वेतन कायद्याप्रमाणे मजुरांना दरमहा वेतन देणे बंधनकारक आहे व तसेच इतर सर्व प्रकारचे कर भरण्याची/अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची असणार आहे.

मा. वृक्ष प्राधिकरण समितीने पारित केलेल्या ठरावामध्ये सन २०१४-१५ या वर्षाकरीता अर्थसंकल्पात "मजूर पुरवठा" या लेखाशिर्षाखाली रु. २.२५ कोटी तरतूद करण्यात आली आहे. तरी प्रभाग समिती क्र. १,२,३ करीता १०५ मजूर व प्रभाग समिती क्र ४,५,६ करीता १०५ मजूर याप्रमाणे एकुण २१० मजुर पूरवठा करणेस व महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार दर सहा महिन्यांनी वेतनाचे दर बदलत असल्यामुळे बदलत्या दराप्रमाणे मजुरांना किमान वेतन अदा करण्याचे खर्चास मा. स्थायी समिती सर्वानुमते आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन अनुमोदक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ (बगीचा/उद्यान) येथे Theme Park विकसित करणेकामीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**प्रशांत दळवी :-**

सदर आरक्षण विकसित करण्याकरिता नवघर येथील नागरिकांचा तिव्र विरोध आहे. Theme Park विकसित केल्यास तेथील नागरीक आंदोलन करतील. करिता सदरचा प्रस्ताव फेर विचारा करिता शासनाकडे पाठविण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

महानगरपालिका क्षेत्रातील आरक्षण क्र. ११७ (बगीचा/उद्यान) येथे Theme Park विकसित करणेकामीच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

सदर आरक्षण विकसित करण्याकरिता नवघर येथील नागरिकांचा तिव्र विरोध आहे. Theme Park विकसित केल्यास तेथील नागरीक आंदोलन करतील. करिता सदरचा प्रस्ताव फेर विचारा करिता शासनाकडे पाठविण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- डॉ. राजेंद्र जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, निवीदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**राजेंद्र जैन :-**

दि. १४/०२/२०१४ रोजी दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता, दै. मिड डे, दै ठाणे वैभव या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केली आहे.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१७०९ | घोडबंदर गाव रेतीबंदर ते मॉडेन झोपडपट्टी पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.(दलित वस्ती सुधारणा)<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. नागना इंटरप्रायझेस<br>३. मे. श्री.सिव्हील इंन्फ्राप्रोजेक्टस्<br>४. मे. विकास इंटरप्रायझेस | रु. ४९,९५,२००/-<br>**१६.६६ % कमी दराने**<br>४.८% कमी दराने<br>१.८८ % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने | दि. ०७/०२/२०१४ | दि. २१/०३/२०१४ | दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता<br>दि. १४/०२/२०१४ | दि.१५/०२/२०१४ |

वरील कामाच्या मे. महेश्वर बिल्डर्स यांच्या अंदाजपत्रकातील दरापेक्षा १६.६६% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ११ :-**

निविदाना मान्यता देणे.

**ठराव क्र. १२ :-**

दि. १४/०२/२०१४ रोजी दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता, दै. मिड डे, दै ठाणे वैभव या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केली आहे.

| अ क्र. | टेंडर आय.डी | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा.आयुक्त यांची प्रशासकीय/ आर्थिक मान्यता दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१७०९ | घोडबंदर गाव रेतीबंदर ते मॉडेन झोपडपट्टी पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे.(दलित वस्ती सुधारणा)<br>**१. मे. महेश्वर बिल्डर्स**<br>२. मे. नागना इंटरप्रायझेस<br>३. मे. श्री.सिव्हील इंन्फ्राप्रोजेक्टस्<br>४. मे. विकास इंटरप्रायझेस | रु. ४९,९५,२००/-<br>१६.६६ % कमी दराने<br>४.८% कमी दराने<br>१.८८ % जास्त दराने<br>अंदाजपत्रकीय दराने | दि. ०७/०२/२०१४ | दि. २१/०३/२०१४ | दै फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता<br>दि. १४/०२/२०१४ | दि.१५/०२/२०१४ |

वरील कामाच्या मे. महेश्वर बिल्डर्स यांच्या अंदाजपत्रकातील दरापेक्षा १६.६६% कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरिया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२, निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**प्रशांत दळवी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजूर प्रति दिन १.५ द.ल.लि. पाणी उपलब्ध करून घेण्यासाठी व गोडदेव जलकुंभ परिसराची पाणी वितरण व्यवस्था सुधारणा करणेसाठी जलवाहिनी अंथरणे कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (पुर्व) फाटक पंपिंग स्टेशन ते धर्म कांटा पर्यंत नविन जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. ४९,९५,४००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. मानस कन्स्ट्रक्शन** | **९.५० % जास्त दराने वाटाघाटीअंती ७.००S जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | १४.०० % जास्त दराने |
| मे. विंध्या ट्रेडर्स | १४.९९ % जास्त दराने |

२) लोढा कॉम्प्लेक्स ते एम.आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू.४५,११,१००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. विंध्या ट्रेडर्स** | **१२.८६ % जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | २३.०० % जास्त दराने |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ च्या कामाकरीता **मे. मानस कन्स्ट्रक्शन** अ.क्र. २ च्या कामाकरीता **मे. विंध्या ट्रेडर्स** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना ही सभा मंजूरी देत आहे.

**अश्विन कसोदरिया :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १२ :-**

निविदा मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजूर प्रति दिन १.५ द.ल.लि. पाणी उपलब्ध करून घेण्यासाठी व गोडदेव जलकुंभ परिसराची पाणी वितरण व्यवस्था सुधारणा करणेसाठी जलवाहिनी अंथरणे कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) भाईंदर (पुर्व) फाटक पंपिंग स्टेशन ते धर्म कांटा पर्यंत नविन जलवाहिनी टाकणे.
(अंदाजित रक्कम रू. ४९,९५,४००/-)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **मे. मानस कन्स्ट्रक्शन** | **९.५० % जास्त दराने वाटाघाटीअंती ७.००% जास्त दराने** |
| मे. देव इंजिनिअर्स | १४.०० % जास्त दराने |
| मे. विंध्या ट्रेडर्स | १४.९९ % जास्त दराने |

२) लोढा कॉम्प्लेक्स ते एम.आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.
(अंदाजित रक्कम रू.४५,११,१००/-)

ठिक आहे. जे कोर्टात गेले त्यांचा विषय वेगळा आहे. आणि तुम्ही आज नोटीस दिली तर ते कोर्टात जातील. कसल्या नोटीसा देता त्यांना. उडवून टाका ना. त्यानंतर असच काढून टाका. हा विषय मी सुध्दा सदस्य असताना प्रत्येक वेळेला मांडला जायचा. ह्या विषयावर कधी काहीच होत नाही. आता तुम्ही जर बोलत आहे. जर तशी तुमची चर्चा झाली आयुक्त साहेबां बरोबर मिटींग झाली तर आम्हाला सांगा ना किती दिवसात कारवाई होईल. तेवढे सांगा विषय संपवा.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

याबाबत जे उच्च न्यायालयाने सांगितलेल्या निर्देशप्रमाणे कायद्याच्या ह्योन तातडीने जी कारवाई करणे अपेक्षित आहे. अनधिकृत विना परवाना टॉवरच्या बाबतीत ते लवकरात लवकर तातडीने कारवाई करण्यांत येईल.

**मा. सभापती :-**

जे कोर्टात आहे. त्यांचा विषय सोडा. जे कोर्टात नाही गेले त्यांचे काय? त्यांच्यावर कारवाई करायला आपल्याला कुठची मनाई आहे.

**प्रशांत दळवी :-**

त्यांचे रितसर आपण अर्ज स्विकारू. २-३ वर्षानंतर जर अर्ज बरोबर असतील तर त्यांना परवानगी देऊ. हे प्रोसिडींग आहे आम्ही बोलतो का. विधी विभागाच म्हणणं आहे ते.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

ह्या मुद्याचं मी सांगतो जे न्यायालयात याचिका दाखल व्हायच्या अगोदर जे टॉवर्स झालेले आहेत. वादग्रस्त आहे. हि याचिका उद्भवल्यानंतर जे अनधिकृत टॉवर्स झाले असतील त्याची कोणतीही या याचिकेशी संबंध न करता त्याच्याबद्दल इंडीपेन्डींटली कारवाई करण्यांचे आयुक्त साहेबांनी..................

**राजेंद्र जैन :-**

यही बात ६ महिने पहले की थी आगे किया क्या उसके उपर?

**रोहिदास पाटील :-**

एक विषय होता महापालिकेच्या प्रॉपर्टीबद्दल प्रश्न विचारला होता गेल्या सभेमध्ये खांबित साहेबांनी उत्तर दिले होत. महापालिकेने बांधलेलं शौचालय बिल्डरने तोडलं त्याला पुष्कळ दिवस झाले. तर काय कारवाई केली त्यांनी मला उत्तर द्याव ना.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे माहिती आलेली असून सदर जागा ही सोसायटीची आहे. धोकादायक इमारत तोडताना शौचालय पडले आहे. सविस्तर माहिती घेऊन आपणास उत्तर देण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

अजून किती दिवस पाहिजे?

**दिपक खांबित :-**

आठ दिवस.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्या दिवशी सांगितलं की विधी अधिकारी उत्तर देतील. काशिनाथ स्मृती इमारती बद्दल तुमची आजची भूमिका महापालिकेची काय ती सांगा.

**दिपक खांबित :-**

सदर इमारतीचा दावा मा. न्यायालयात प्रलंबित आहे. मा.न्यायालयाचे कुठलेही आदेश ह्यांच्यावर नाही. आणि सदर ठिकाणी जे रहिवासी आहेत त्यांनी ती इमारत दुरूस्ती करण्याकरीता परवानगी देवू म्हणून आपल्याकडे आग्रह झालेला आहे. याबाबत आयुक्त स्तरावर निर्णय होईल. आम्ही फाईल पुट अप केले. त्यावर २-३ दिवसांवर निर्णय होईल.

**रोहिदास पाटील :-**

खांबित साहेब, आपलं असं म्हणणं आहे की, तुमच्या हातात आता जो स्ट्रक्चर ऑडीट रिपोर्ट आहे. त्वरीत बिल्डींग खाली करा असा रिपोर्ट तुमच्या हातात आहे. तुम्ही मागविला आहे.

**दिपक खांबित :-**

सर त्याप्रमाणे सगळ्यांना नोटीसा दिलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अशी नोटीस दिले. २ मे रोजी हि बिल्डींग तुम्ही स्वतः खाली नाही केली तर आम्ही लाईट पाणी बंद करून पोलिसांच्या सोबत ती बिल्डींग खाली करू. अशी तुम्ही नोटीस बजाविलेली आहे. त्या नोटीसचा काय झाल?

**दिपक खांबित :-**

त्या अनुषंगाने आम्ही गेलो पण होतो. इमारतींची पाहणी केली. त्यावेळेला त्या लोकांनी म्हटलं की आम्ही आयुक्त साहेबांना भेटलो होतो. ग्राऊंड फ्लोअर प्रत्येक रूम चेक केला. टॅरेस चेक केला आणि त्यावर त्यांनी दुरूस्ती परवानगी मागितली. त्यावर आम्ही चेकिंग करून आलो. आता आम्ही त्याच्यावर डिसीजन घेऊ की कधी खाली करायची काय करायच ते.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेबांच, कार्यकारी अभियंताच मत पडल असेल की, ही धोकादायक इमारत नाही. लेखी उत्तर देऊन टाका. विषय संपला ना. इथे कोण कशाला विचारणार?

**दिपक खांबित :-**

त्याच्यावर चर्चा झाली. डिसीजन होईल आता.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही तमाम मिरा भाईंदरच्या लोकांना सांगतात की, स्ट्रक्चर ऑडिटप्रमाणे बिल्डींगखाली करणार आणि तुम्ही करता. स्ट्रक्चर ऑडिटचा रिपोर्ट तुमच्या हातात आहे. आणि तुम्ही अशी दुहेरी भुमिका का घेता? जबाबदारी घ्या ना. काही प्रश्न नाही. त्याच्यामध्ये कोणीच इन्ट्रेस्टिंग नाही. तुम्ही अस उत्तर द्या. त्यांनी तुम्हाला पत्र दिलेल आहे ना की, आमची खात्री पटले ही धोकादायक इमारत नाही विषय संपला.

**दिपक खांबित :-**

निर्णय होईल ना, निर्णय घ्यायला वेळ लागतो.

**रोहिदास पाटील :-**

हा चेष्टेचा विषय नाही. आज संध्याकाळी जर काही झाल तर तुम्ही काय करणार आहात. लोकांना काही होऊ नये म्हणून तुम्ही जबरदस्तीने लोकांना बाहेर काढतात. ह्यांना पटल तर हे खाली ठेवतात.

**दिपक खांबित :-**

तस नाही. कारवाई त्यावर चालू आहे.

**रोहिदास पाटील :-**

काय कारवाई आहे. सांगा की नाही, रेकॉर्डवर येवू द्याना. ही कारवाई चालू आहे. कामाची ही पध्दत आहे. मिरावाल्यांना माहित पडेल, सृष्टीवाल्यांना माहित पडेल, उत्तनवाल्यांना माहित पडेल. सगळेच ह्या सभागृहामध्ये आहेत.

**राजु भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझ्या प्रभागात पण मिराधामध्ये असाच प्रकार आहे. तर त्या लोकांना पोलिस प्रोटेक्शनने खाली करण्याची नोटिस आलेली आहे. तर तिथे आज पर्यंत अशी काही हानी झालेली नाही. तर १६० लोकांचा विषय आहे. तर त्या लोकांना काय करणार वेळेवर जर खाली करायला लावल तर.

**दिपक खांबित :-**

खाली करणार ना.

**रोहिदास पाटील :-**

माजी सभापती साहेब सांगतात की, काका त्यांना नोटिस पण दिलेली नाही. म्हणजे स्ट्रक्चर ऑडिट पण तुमच नाही झाल. स्ट्रक्चर ऑडिट झालेल आहे ही बिल्डींग त्वरीत खाली करा.

**दिपक खांबित :-**

स्ट्रक्चर ऑडिट झालेल आहे ना.

**रोहिदास पाटील :-**

काका, स्ट्रक्चर ऑडिट झालेल आहे. पण वेळेवर लोक जाणार कुठे?

**दिपक खांबित :-**

आता आम्ही बिल्डींग तोडायची सुध्दा नोटिस दिले. परवा दिवशी आयुक्त साहेबांची मान्यता घेतली. आपल्याला ९ बिल्डींग तोडायच्या आहेत. त्यांना नोटिस पण दिली. १५ इमारत तोडण्यासाठी कंत्राटदार नेमणेसाठी कंत्राटदार नेमण्याची कार्यवाही सुरु आहे. ती पण बिल्डींग घेतली.

**रोहिदास पाटील :-**

त्या बिल्डींगमध्ये आताच्या क्षणाला कोण आहेच नाही. तुमच्या कार्यपध्दतीमुळे बोलतो. एकाला एक न्याय, दुसऱ्याला एक न्याय. तुम्ही देऊ नका ना.

**दिपक खांबित :-**

त्याचा डिसीजन होईल.

**प्रशांत दळवी :-**

दि. ०२/०१/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १५ :-**

दि. ०२/०१/२०१४ रोजीचे मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १५ :-**

दि. ०२/०१/२०१४ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १६, माहे जाने. २०१४ ते मार्च २०१४ त्रैमासिक व सन २०१३-१४ वार्षिक जमा खर्चाचे अवलोकनाबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब, अभिनंदनाचा एक ठराव मांडायचा आहे.

**राजेंद्र जैन :-**

लेखा विभागाने महानगरपालिकेचे वार्षिक (सन २०१३-१४) तसेच जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ चे जमाखर्च मा. स्थायी समितीपुढे सादर केलेले आहे. या दोनही जमाखर्चाचे अवलोकन केले असता जमा बाजूला दाखविलेली मालमत्ता कराची येणे रक्कम येत्या दोन महिन्यात संबंधीत विभागाने वसुल करावयाची आहे.

तसेच लेखा विभागाने वेगवेगळ्या लेखाशिर्षाखाली मुदत बंद ठेवी ठेवलेल्या आहेत. या मुदत बंद ठेवीचा संपूर्ण तपशील, विविध खात्यांमध्ये असलेले रिझर्व फंड याचा तपशील, सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात अखेरच्या शिल्लकेचा तपशिल या मा. स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ अनुसूचीत "ड" नियम १० अन्वये प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक नमुना क्र. ४३ प्रमाणे पूर्ण करुन मा. स्थायी समितीस याबाबतचा अहवाल तातडीने सादर करावा. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आतापर्यंत कर आकारणी पुस्तिका का ठेवण्यात आलेल्या नाहीत. याचा अहवाल स्वतंत्रपणे द्यावा. करीता सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करायच्या अगोदर काल आम्ही चेंम्बरला मिटींगसाठी बसलो होतो. तर ऑडीटर साहेबांच म्हणन अस आहे. त्यांच्याकडे माणसच नाही ते सगळ करायला. एक ही अधिकारी, टायपिस्ट नाहीत.

**भागवत मुरकूटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. माझ्याकडे २ अधिकारी कार्यरत आहे. ते अतिरिक्त कार्यभारात काम करतात. माझ्याकडील जी कामे आहेत, ती वारंवार प्रलंबित राहतात. विशेषतः लेखापरिक्षण अहवालाच काम प्रलंबित आहे. मी साहेबांना विनंती करण्यात आलेली आहे की मला अधिकारी कर्मचाऱ्यांच करण्यात याव म्हणून ................

**प्रशांत दळवी :-**

ठिक आहे ना मा. सभापती महोदय जे इनकमिंग आहे ना त्याच काय पुस्तकच नाही आपल्याकडे. आपण फक्त खर्चच करत चाललो. विचारा त्यांना ह्याची नोंद आहे का आपल्याकडे? किती घेतो काय करतो नोंद आहे का? आपल्या पालिकेकडे पैसा येतो त्याची नोंद कुठे आहे?

**भागवत मुरकूटे :-**

नोंद आहे ना. आपल्या लेखा विभागात जे आहे त्याची नोंद होते ना.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्याचा मोठा मुद्दा आहे. त्याला जोडून मी बोलते. तिथे खाली टॅक्समध्ये गेले ना की, हा इश्यु सगळ्यात मोठा असतो. मी काय करणार माझ्याकडे स्टाफ नाही. तुम्ही नगररचनाकडे जा माझ्याकडे स्टाफ नाही. स्टाफ गेला कुठे? हा त्यांचा इश्यु आहे. पण तुमचा प्रत्येक डिपार्टमेंट हेच सांगते की, माझ्याकडे स्टाफ नाही. म्हणजे नगरसेवक तिथे फेऱ्या मारतात. तुमचा काय अनुभव आहे मला माहित नाही. पण जेव्हा पण कुठच्या डिपार्टमेंटकडे गेल तर माझ्याकडे स्टाफ नाही. माझ्याकडे संगणक चालक नाही, माझ्याकडे ऑपरेटर नाहीत हे प्रत्येक डिपार्टमेंटच उत्तर आहे. मग, काम करायच नाही म्हणून केलेली ही सबब आहे की, तुम्हाला काम करायच नाही? नेमक काय आहे?

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय, इसी संदर्भ में बोलना चाहता हुँ की यह ६/१०/२०१२ का जावक क्र.मनपा/आस्था/८४४/२०१२-१३ मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापना वरील वर्ग ३-४ मध्ये वन विभाग आणि जाहिरात यह पुरा हुआ था। विक्रम कुमार साहब ने मान्यता दी थी। इसके अंदर वर्ग ४ में तो आपने आदमी लिए ही नहीं। पहले जरुरत थी तो निकाला होगा, इसमें कारवाई की होगी, मायापच्ची की होगी।

**मा. सभापती :-**

वो आदमी लिए की नहीं लिए वो बाद की बात है। जो नहीं है वो मत बोलो। लेकिन इतने स्टाफ है वो किधर है वो बताओ।

**राजेंद्र जैन :-**

सब साहब यही बोल रहे है की, चपरासीवाला काम में करता हूँ। कुरळेकर साहब भी वही बोलते है चपरासीवाला काम में करता हूँ। तो उनको चपरासी दो ना।

**रोहिदास पाटील :-**

अटेन्डेन्सच तुमच परसेंटेज काय आहे.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

नगरपालिका आस्थापनावरचे जे कर्मचारी आहेत त्या कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध ठरवणे, पद मंजुर करणे, त्या पदाला मंजुरी घेणे, वाढवून घेणे, भरती करणे हा फार वेळखाऊ प्रकार आहे बरेच दिवसापासून विविध विभागाकडून वाढीव पद मागणी पाहिजे ही खरं आहे. त्याला वेळ लागेल. काही जरी केल तरी काय तडकाफडकी लगेच पदे मंजुर होणार नाही. ती काय लगेच एक दिवसात भरती होणार नाही. परंतु, जे कर्मचारी

आपल्या आस्थापनेवर आहेत जेवढी मंजुर आहेत, जे कार्यरत आहेत, जे काम करतात. तेवढ्या सर्व विभागप्रमुखांकडून काम करुन घेण गरजेच आहे. तुम्ही पद मंजुर पाहिजेत, नविन पदे भरती नाही झाली म्हणून आजच काम तुम्ही थांबवून किंवा ते प्रलंबित ठेवणे हा त्याला पर्याय होत नाही किंवा त्या अशाप्रकारे हे चूकीच आहे. आता सर्वच विभागामध्ये ती परिस्थिती आहे. ज्या-ज्या ठिकाणी कामाची निकड लक्षात घेऊन मी एल.बी.टी. मधले लोक सुध्दा मी इतर विभाग ट्रान्सफर कमी केले. आस्थापनामध्ये १५ क्लार्क काम करत होते. त्यातले सुध्दा ५ क्लार्क ज्या-ज्या विभागाला गरज आहे म्हणून तिकडे ट्रान्सफर केले अस आहे. हे काय कर्मचारी नेमायचे म्हटल्यानंतर आपल्याला जे स्थायी आस्थापना कर्मचारी नेमायचे आहे. त्याला तडकाफडकी आज गरज लागली म्हणून लगेच पुढच्या आठवड्यात ॲडव्हरटाईज काढली आणि नवीन पदे नेमली असे होऊ शकत नाही. हे ह्या सर्व खाते विभागप्रमुखांना पण ह्याची जाण आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझा प्रश्न होता. आता अटेंडन्सचा परसेंटेज काय आहे?

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

प्रश्न असा आहे की, संबंधित विभाग प्रमुखांना माझी विनंती आणि सुचना पण आहे की, जे मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध आहे. त्याच्याकडून प्रभावीपणे काम करुन घेणे. त्याच्याकडून काम निपटाराचा पाठपुरावा करुन घेणे. फक्त कर्मचारी नाही ही सबब सांगुन काम प्रलंबित ठेवणे किंवा वेळ लावणे हा त्याला पर्याय होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

ढगे साहेब, आता तुमचा स्टाफ आहे ना. सगळे एच.ओ.डी. आहेत. तुमच्या विश्वासातले १० एच.ओ.डी. उभे करा. तुम्हाला दिलेला स्टाफ नग तो शिपाईचा असो, त्यांच अटेंडन्स काय आहे ५० च्या २५ येतात का की ५० पैकी १५ येतात ३५ ॲब्सेंट आहेत असा एकदा विषय घ्याना. प्रभाग अधिकाऱ्यांना विचारा तुम्हाला दिलेली माणस तुमच्याकडे कामाला येतात की नाही येत? जे वॉर्ड ऑफिसर हजर आहेत. त्यांच्या ताब्यात २०-२५-५० माणस ताब्यात दिलेली आहेत. त्या सहा प्रभाग अधिकाऱ्यांनी त्यांची माणस हजर आहेत की नाही किंवा टॅक्स डिपार्टमेंटचे एच.ओ.डी. कोण आहेत. त्यांना आमच्यासमोर उभ तर करा ना. सगळेच सांगतील माणस नाहीत. मग माणस कुठे आहेत? आमचा प्रश्न असा आहे, एका दोघांना विचारा तरी म्हणजे पुढच्या मिटींगला तयारी करुन येतील. सचिव साहेबांना किती माणस दिलेत आणि किती हजर आहेत.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे सुरुवातीपासून दोन क्लार्क आहेत, ते दोन्ही हजर आहेत.

**प्रकरण क्र. १६ :-**

माहे जाने. २०१४ ते मार्च २०१४ त्रैमासिक व सन २०१३-१४ वार्षिक जमा खर्चाचे अवलोकनाबाबत.

**ठराव क्र. १६ :-**

लेखा विभागाने महानगरपालिकेचे वार्षिक (सन २०१३-१४) तसेच जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ चे जमाखर्च मा. स्थायी समितीपुढे सादर केलेले आहे. या दोनही जमाखर्चाचे अवलोकन केले असता जमा बाजूला दाखविलेली मालमत्ता कराची येणे रक्कम येत्या दोन महिन्यात संबंधीत विभागाने वसुल करावयाची आहे.

तसेच लेखा विभागाने वेगवेगळ्या लेखाशिर्षाखाली मुदत बंद ठेवी ठेवलेल्या आहेत. या मुदत बंद ठेवीचा संपूर्ण तपशील, विविध खात्यांमध्ये असलेले रिझर्व फंड याचा तपशील, सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात अखेरच्या शिल्लकेचा तपशिल या मा. स्थायी समितीमध्ये ठेवण्यात यावा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ अनुसूचीत "ड" नियम १० अन्वये प्रभाग निहाय कर आकारणी पुस्तक नमुना क्र. ४३ प्रमाणे पूर्ण करुन मा. स्थायी समितीस याबाबतचा अहवाल तातडीने सादर करावा. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आतापर्यंत कर आकारणी पुस्तिका का ठेवण्यात आलेल्या नाहीत. याचा अहवाल स्वतंत्रपणे द्यावा. करीता सदरचा विषय पुढील सभेत घेण्यांत यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजेंद्र जैन**　　　　**अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १७, भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. २३९ ते आरक्षण क्र. २४५ पर्यंत रस्ता तयार करणे व रस्त्यालगत गटार बांधणे कामाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता आरक्षण क्र. २३९ ते आरक्षण क्र. २४५ पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ४२,५६,४००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता आरक्षण क्र. २३९ ते आरक्षण क्र. २४५ पर्यंत रस्त्याचे सोलींग, खडीकरण व ग्राऊंटींग करणे. | रु. ४९,९७,७५०/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) एन.एच.स्कूल रस्त्यावरील ओसवाल पॅराडाईज इमारत क्र. ३ ते एन.एच. स्कूल सर्कल पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू. ४१,४२,८००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) संघवी नगर न्यु गोकुळ धाम सोसायटी ते अंबर प्लाझा हॉलपर्यंत विकास योजना रस्ता रुंदीकरण, डांबरीकरण करणे. | रू. ३९,६३,४४०/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते एस.के.स्टोन पूनमगार्डन पर्यंतचा (विनय हार्मिटेज व निळकंठ टॉवर समोरील रस्ता) रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. २६,६१,६००/- |
| ६ | भाईंदर (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता, एच.डी.एफ.सी. बँक ते साई पॅलेस, रामदेव पार्क पर्यंत रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. ४९,९८,८००/- |
| ७ | हटकेश येथील रितु पॅराडाईझ, शांतीवन ते साईसरस्वती धाम व पूनमगार्डन पर्यंत रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. ४९,९९,१००/- |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ७ च्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

इथे दोन कामे दिलीत. बाकीच्या कामांची यादी तर द्या.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १७ :-**

विविध विकास कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. १७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात करावयाच्या विविध विकास कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता आरक्षण क्र. २३९ ते आरक्षण क्र. २४५ पर्यंत रस्त्यालगत गटार बांधणे. | रु. ४२,५६,४००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) दिपक हॉस्पीटल रस्ता आरक्षण क्र. २३९ ते आरक्षण क्र. २४५ पर्यंत रस्त्याचे सोलींग, खडीकरण व ग्राऊंटींग करणे. | रु. ४९,९७,७५०/- |
| ३ | मिरारोड (पूर्व) एन.एच.स्कूल रस्त्यावरील ओसवाल पॅराडाईज इमारत क्र. ३ ते एन.एच. स्कूल सर्कल पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रू. ४१,४२,८००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) संघवी नगर न्यु गोकुळ धाम सोसायटी ते अंबर प्लाझा हॉलपर्यंत विकास योजना रस्ता रुंदीकरण, डांबरीकरण करणे. | रू. ३९,६३,४४०/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता ते एस.के.स्टोन पूनमगार्डन पर्यंतचा (विनय हार्मिटेज व निळकंठ टॉवर समोरील रस्ता) रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. २६,६१,६००/- |
| ६ | भाईंदर (पूर्व) कनकिया मुख्य रस्ता, एच.डी.एफ.सी. बँक ते साई पॅलेस, रामदेव पार्क पर्यंत रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. ४९,९८,८००/- |
| ७ | हटकेश येथील रितु पॅराडाईझ, शांतीवन ते साईसरस्वती धाम व पूनमगार्डन पर्यंत रस्ता खडीकरण व ग्राऊटींग करणे. | रू. ४९,९९,१००/- |

वरीलप्रमाणे अ.क्र. १ ते ७ च्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १८, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**राजेंद्र जैन :-**

दि. १४/०२/२०१४ रोजी दै. फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता, दै. मिड डे, दै. ठाणे वैभव या वृत्तपत्रात व e-Tendering संकेत स्थळ https://mbmc.eproc.in मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरिता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केली आहे.

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नाव/ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/आर्थिक मान्यता दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१७१० | मुर्धा गाव देव आगार येथे नाला बांधणे. (दलित वस्ती सुधारणा योजना)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३. मे. एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>५. मे. स्पार्क सिव्हील इंन्फ्राप्रोजेक्टस्<br>६. मे. नागना इंटरप्रायझेस | रु. ५०,००,०००/-<br><br><br>१३.७१ % कमी दराने<br>६.०० % जास्त दराने<br>४.०० % कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१२.६२ % कमी दराने<br>५.५ % कमी दराने | दि. ०७/०२/२०१४ | दि. २१/०३/२०१४ | दै. फ्रि प्रसे जरनल<br>दै. लोकसत्ता<br>दि. १४/०२/२०१४ | दि. १५/०२/२०१४ |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, गेल्या मिटींगला पण आणि वारंवार गेल्या ६-८ महिन्यापासून जेव्हापासून न्यायालयाने सुचना केल्यात प्रशासनाला तेव्हापासूनचा हा विषय आम्ही सातत्याने त्याचा पाठपुरावा करत आलो. परंतु, प्रशासनाला त्याची गरज भासत नाही अस मला वाटते. राष्ट्रीय फेरिवाला धोरण निश्चित कराव असे प्रशासनाचे आदेश होते. आणि चार महिन्यात ते पूर्ववत करावे. तर प्रशासनाने काय पाऊल उचलल की नाही किंवा त्याची समिती गठित केलेली आहे की नाही गेल्यावेळेला, सभापती महोदय आपल्या माहिती प्रमाणे सर्व सदस्य होते आणि त्यावेळेला ढगे साहेब गैरहजर होते. त्यामुळे हा चार्ज ढगे साहेबांकडे आहे अस सांगण्यात आल होत. तर आयुक्त महोदय आपण जर या संदर्भात सांगितल तर बर होईल.

**विलास ढगे (मा. उपायुक्त (मु.)) :-**

आता माझ्या अनुपस्थितीत आपल्याला काय माहिती दिली त्याच्यावर मी भाष्य करण योग्य नाही. राष्ट्रीय फेरिवाला धोरण हे परवाने देण्याबाबतशी निगडीत आहे. परवाना विभाग उपायुक्त श्री. कुरळेकर साहेब ह्यांच्याकडे आहे. तर त्याबाबत काल राष्ट्रीय फेरिवाला धोरणानुसार काय उपाययोजना अंमलबजावणी करायची त्या समित्या ज्या गठीत करायच्या आहेत, त्या गठित करणेबाबत शहर समिती आणि तांत्रिक समिती गठित करणे, प्रभाग स्तरावर समिती गठित करणे आणि जो ह्या २ वर्षापूर्वी केलेल्या सर्व्हेक्षणानुसार जे फेरिवाले आहेत. त्यांना परवाना देण्याबाबतच्या सुचना काल आयुक्त साहेबांनी प्रशासनाला दिलेल्या आहेत आणि त्याची लवकरात लवकर कार्यवाही संबंधित विभाग खातेप्रमुखाकडून केली जाईल.

**प्रशांत दळवी :-**

मा. सभापती महोदय, आम्ही जेव्हा प्रश्न उपस्थित करतो त्या आदल्या दिवशी ह्यांच्या बैठका होतात. एकतर आयुक्त साहेब आदल्या दिवशी यांना सुचना करतात किंवा आदेश देतात. आता मला माहित नाही. आदेश तर दिलेले आहेत. ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे आणि ते प्रोसिडिंगवर पण घेतलय ह्याची अंमलबजावणी कधी होणार? आपण कोर्टाचा अवमान करतो ना चार महिन्यात ही समिती गठित करायची होती आणि आज ८ महिने झाले समिती गठित करत नाही आणि राजरोसपणे कुठेही फेरिवाले बसलेत. त्याच्यावर काही अंकुश नाही. परवा आमचा हिंदुचा सण वटपोर्णिमेचा तिकडे सगळ्या महिला बाजारात खरेदी करीत असतात हे काय निर्देश आहे. जे काय उच्च न्यायालयाने राष्ट्रीय धोरण पारित करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याचे जे काय पत्र न्यायालयाने पाठवलेत त्या पत्राचे वाचन इथे व्हाव अशी माझी विनंती आहे. त्या पत्रात काय लिहिल त्याच वाचन पूर्ण करा इथे नंतर त्या फेरिवाल्यांवर कारवाई करा का धोरण निश्चित होत नाही? प्रशासन आणि फेरिवाल्यांच बाजार फी वसुल करतात त्यांच काही साटलोट आहे का? कुठे विलंब होतो तिथे ही आपला कर्मचारी कमी पडतो. प्रभाग व्हाईज सुचना दिल्या होत्या प्रभाग व्हाईज सगळ्यांना फेरिवाला धोरण निश्चित करायच होत. कालच मिटींग झाले. परवाच आदेश दिले. कालच आदेश काढण्यात आले. हा काय प्रकार चाललाल?

**मा. सभापती :-**

पूढच्या मिटींगला स्वतः कमिशनर साहेब येणार तेव्हा हा विषय आपण मांडू.

**वंदना पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी पण बाजार फी विषयीच बोलते. त्यांची एवढी मनमानी चालली आहे की, १० रु. जिथे घ्यायचे आहे, तिथे ५० आणि ४० रु. घेतले जातात. ह्याच्यावर तुम्ही काय कारवाई करणार. आपण ठेका तर त्यांना दिला.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आपण कमिशनर साहेब आल्यानंतर तो विषय बोलू.

**अशरफ शेख :-**

मा. सभापती महोदय, सोमवार बाजारमध्ये ५० रु. च्या ऐवजी १०० रु. घेतात. म्हणजे २५ रु. ची पावती असते. ५० रु, ७५ रु, १०० रु. पर्यंत ते लोक घेतात.

**मा. सभापती :-**

ह्या बाबतीवर तर आज जेवढी वर्षे मी आहे ना तेवढ्या वर्षापासून तो चाललेला आहे पण, त्याच्यावर कोणी कारवाई केली का? आज माझ १७ वे वर्ष नगरसेवक पद आहे. मी प्रत्येक वेळेला बोललेलो आहे की, बाजारवाल्यांची जेव्हा ५ रु. फी होती ना तेव्हा १५ रु. घेत होते. १० रु. होते तेव्हा २५ रु. घ्यायला लागले. १५ रु. ते २० रु. ते वाढत गेले. आपण ह्या विषयावर नंतर बोलू. मला अतिमहत्वाच्या विषयावर बोलायच आहे. उपायुक्त साहेब, हे जे धोकादायक इमारती ज्या आज तोडल्या गेल्या आहेत. त्यांच मटेरियल तिथुन उचलले गेले नाही आणि सगळ्या नागरिकांच्या तक्रारी आल्यात. आज पावसाळा आला म्हणून सगळे नागरिक तक्रार करतात आणि जी बिल्डींग तोडले तिथे घाण वैगेरे टाकली जाते. त्याच्यामुळे आरोग्याला कुठे धोका येतो आणि ते उचलल नाही तर पावसाळ्यात फार त्रास होणार. माझ्या वॉर्डात भरपुर तशा बिल्डींग आहेत आणि जी बिल्डींग कोसळणार आहे त्याचा धोकादायक आहे. त्याच्या खाली कोण आल, कोण गेल तर त्याला जबाबदार कोण असेल? आणि त्याच्यावर तुम्ही काय कारवाई कराल ते आम्हाला सांगा ना. त्या ठेकेदारावर कारवाई कराल जी बिल्डींग तोडले त्या बिल्डरवर किंवा त्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या लोकांवर कोणावर तुम्ही कराल आणि तो जो मलबा आहे तो किती दिवसात उचलावा असा तुम्ही आदेश द्याल?

**दिपक खांबित :-**

एकुण अशा सात बिल्डींग आहेत. त्याच्या मधल्या जवळ-जवळ पाच बिल्डींग खारीगावमध्येच आहे. ज्या सात बिल्डींग पैकी एका बिल्डींगकडे जायला फक्त रस्त्याची अडचण आहे. रमेश कुंज बिल्डींग आहे ना तिकडची अडचण आहे. तर आयुक्त साहेबांनी आपल्याकडून उचलून घ्यायला परवानगी दिलेली आहे. त्याप्रमाणे १५ ते २० दिवसामध्ये आम्ही ज्या धोकादायक बिल्डींग आहेत, त्याचा सगळा मलबा उचलून साफ करुन घेत्तो.

**मा. सभापती :-**

रमेश कुंज बिल्डींगला जायला प्रॉब्लेम असेल तर ते आपण करायच नाही का?

**दिपक खांबित :-**

करायच आहे पण त्याला वेळ लागेल. त्याला मशिन जात नाही. माणस लावून काढायला लागेल.

**मा. सभापती :-**

मग माणस लावून करायला लावाना त्याला वेळ लावू नका ना तुम्ही.

**दिपक खांबित :-**

त्याला सुध्दा आम्हाला मंजुरी मिळालेली आहे.

**मा. सभापती :-**

सगळ्यात मोठ रमेश कुंजचा मलबा आहे बाकी कुठच कोण बोलत नाही.

**दिपक खांबित :-**

माणस लावून काढतो.

**मा. सभापती :-**

तिथे एवढी घाण एकतर इंडस्ट्रीयलचे रस्ते एवढे तिथुन मुल जातात. त्याच्या बाजूला दोन शाळा आहेत. तिथुन मुल जातात. एखाद दिवशी जर अंगावर पडल तर त्याला जबाबदार कोण?

**दिपक खांबित :-**

माणस लावून काढायला सांगतो.

**मा. सभापती :-**

माणस लावून ताबडतोब कारवाई झाली पाहिजे.

**दिपक खांबित :-**

तिथे आणि लक्ष्मी गंगा अशा दोन बिल्डींग आहेत. तिकडे माणस लावून काढायला लागेल.

**मा. सभापती :-**

तुम्ही ताबडतोब त्याच्यावर कारवाई करा आणि ते झाल पाहिजे.

**अशरफ शेख :-**

मा. सभापती महोदय, मिरारोड मध्ये रेल्वे समांतर रोड ते आपल सुंदर झाले आहे. तिथे डिव्हायडर पण झालेले आहे. तिथे माती आणि खाद अजूनपर्यंत झालेल नाही. फक्त निर्देष तुम्ही द्या. ते लवकरात लवकर माती आणि झाडे लावायची आहेत तिथे १०० फुटाच रोड आहे. एक कि.मी. चा तिथे लवकर माती आणि झाडे लावायची तुम्ही सुचना द्या.

**प्रभात पाटील :-**

मागच्या मिटींगमध्ये शाळेचा विषय होता. तेव्हा सर्व सदस्यांनी त्याला चांगल्याप्रकारे मान्यता दिली. त्याबद्दल मी आपले आभार मानते.

**प्रकरण क्र. १८ :-**

निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) .

**ठराव क्र. १८ :-**

दि. १४/०२/२०१४ रोजी दै. फ्रि प्रेस जरनल, दै. लोकसत्ता, दै. मिड डे, दै. ठाणे वैभव या वृत्तपत्रात व e-Tendering संकेत स्थळ https://mbmc.eproc.in मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरिता खालीलप्रमाणे ठेकेदाराने मुदतीत निविदा सादर केली आहे.

| अ.क्र. | टेंडर आयडी | कामाचे नाव/ठेकेदाराचे नाव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर | मा. आयुक्त यांची प्रशासकीय/आर्थिक मान्यता दिनांक | मा. निविदा समिती बैठकीची शिफारस | वृत्तपत्राचे नाव व प्रसिध्दी दिनांक | ई-टेंडरींग निविदा प्रसिध्दी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २१७१० | मुर्धा गाव देव आगार येथे नाला बांधणे. (दलित वस्ती सुधारणा योजना)<br>१. मे. राठोड ब्रदर्स<br>२. मे. गजानन कंन्स्ट्रक्शन<br>३. मे. एम.ई.प्रोजेक्ट प्रा.लि.<br>४. मे. गुरुजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.<br>५. मे. स्पार्क सिव्हील इंन्फ्राप्रोजेक्टस्<br>६. मे. नागना इंटरप्रायझेस | रु. ५०,००,०००/-<br><br><br>१३.७१ % कमी दराने<br>६.०० % जास्त दराने<br>४.०० % कमी दराने<br>अंदाजपत्रकीय दराने<br>१२.६२ % कमी दराने<br>५.५ % कमी दराने | दि. ०७/०२/२०१४ | दि. २१/०३/२०१४ | दै. फ्रि प्रेस जरनल<br>दै. लोकसत्ता<br>दि. १४/०२/२०१४ | दि. १५/०२/२०१४ |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. राजेंद्र जैन** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**
आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ १.१५ वजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २ / ८ /२०१४

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ४८ ) :-** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा *गांधी रुग्णालय व नगरभवन इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा* बसविण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उक्त नमुद मुख्य कार्यालय, भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय व नगरभवन इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणेकामी मा. महासभा ठराव क्र. २३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार वरील तीनही इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणेकामी एकुण तीन वेळा प्रत्येक कामाकरीता स्वतंत्र जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्या सदरच्या तीनही वेळा प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर निविदा प्रक्रियेत केवळ मे. एक्सीड फायर सर्विसेस या एकाच कंपनीने भाग घेतला आहे. मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने सदर निविदा धारकाचे दर पत्रक उघडण्यात आले असुन दि. २५/०७/२०१४ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीत वाटाघाटीअंती मे. एक्सीड फायर सर्विसेस यांनी सादर केलेले दर आणि अग्निशमन विभागाने अंदाजे प्रस्तावित केलेल्या दराची तुलना केली असता सदरचे दर वाजवी आहेत. इमारतीकरीता आवश्यक असणाऱ्या अग्निशमन यंत्रणेबाबत मा. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | इमारतीचे नाव | अंदाजित खर्च | निविदेत सादर केलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणेबाबत | ६५,००,०००/- | ६६,०७,०००/- | ६५,५०,०००/- |
| २. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगरभवन इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणेबाबत | ३२,००,०००/- | ३२,२०,०००/- | ३१,९५,०००/- |
| ३. | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न स्व. इंदिरा गांधी रुग्णालय इमारतीमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणेबाबत | २२,००,०००/- | २२,१५,०००/- | २१,९८,०००/- |

तरी वरील नमुद इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा उभारणेकरीता मे. एक्सीड फायर सर्विसेस यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरास मा. स्थायी समिती सभेच्या निर्णयास शिफारस आहे.

**~~उप~~-आयुक्त**
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. ०२/०८/२०१४

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ५९ )** अग्निशमन दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य (उर्वरित) मिळणेबाबत.

मिरा भाईंदर अग्निशमन दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता सन २०१२-१३ मध्ये प्रस्तावित केलेल्या गणवेश व इतर साहित्य करीता रुपये ७५.०० लाख एवढा खर्च अपेक्षित असलेबाबत अहवाल सादर करण्यात आला होता. परंतू सन २०१२-१३ मध्ये उपलब्ध असलेल्या रु. ५०,००,०००/- एवढया तरतूदीनुसार गणवेश व इतर साहित्य पुरविण्यात आले होते.

सद्यःस्थितीत अग्निशमन दलात एकूण ९९ अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून दलातील सर्व जवानांना साहित्य प्रदान करण्यात आलेले नाही. सद्यःस्थितीत केवळ ६६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना फायर सुट प्रदान करण्यात आले आहेत. परंतू उर्वरित अधिकारी व कर्मचाऱ्यांना फायर सुट व उर्वरीत साहित्य प्रदान करणे आवश्यक आहे. सदर उर्वरीत आवश्यक साहित्याचा तपशिल व सदर साहित्याकरिता यापूर्वी ठेकेदाराने सादर केलेल्या दराचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1 | Fire Fighter Suit, | 33 |
| 2 | Fire Man Helmet, with Neck Protector & Visor, Complying Standard EN- 443. | 33 |
| 3 | Track Suit (Pant T-Shirt, Feather Touch Fabric 40/60) with Fire Brigade's Logo | 99 |
| 4 | Half Pant for Drill as per individual measurement (with stitching, 3 loops & 2 side pockets) of RAYMOND SUPHIER Cloth ( Navy Blue) | 198 |
| 5 | Sports Shooes (Power / Action /Nike Company) | 99 |
| 6 | Driver Arm Batch ( Driving Wheel) | 20 |
| 7 | Rain Coat (Pant-Shirt, Make-Duckback 1475512) | 100 |
| 8 | Sweater (Woolan, Blue) | 99 |
| 9 | Sholder flaps (Leadin fireman, Driver operator & Driver) | 50 pair |
| 10 | Pant (with stitching & 3 loops) of RAYMOND SUPHIER Cloth ( Navy Blue) | 02 |
| 11 | Pick Cap of RAYMOND SUPHIER Cloth (Navy Blue) with Monogram (metal) ( for Driver Operator & Driver) | 01 |
| 12 | Sky Blue plane fine quality cloth Teri cotton Shirt with double Brest pocket, Sholder Flap, Strips, Half Sleaves, Liberty Collar as per individual measurement (with stitching) ( Bombay Dying / Mafatlal/ Centurian. | 02 |
| 13 | Driver Arm Batch ( Driving Wheel) | 25 |
| 14 | Shoulder flaps (Sub Officer) | 25 |
| 15 | T-Shirt for P.T. (White Colour with printed logo) | 99 |
| 16 | P. T. Shooes (canvas white) | 99 |
| 17 | Sataranji (7' X 3') | 99 |

उपरोक्त तक्त्यानुसार सदरचे गणवेश व इतर साहित्य खरेदी करण्याकरिता अंदाजे रु. ३०.०० लाख एवढा खर्च अपेक्षित आहे.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक "ब" सार्वजनिक सुरक्षितता या लेखाशिर्षा अंतर्गत कर्मचारी गणवेश व बक्षीसे रु. १००.०० लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे. चालु आर्थिक वर्षात सदर तरतुदीतुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

कृ. मा. प.

[illegible] पोलिस [illegible] करण्यात [illegible] आवश्यकतेनुसार [illegible] सहकार्य [illegible]
आहे. [illegible] सूचना प्रसिद्ध करण्याकामी [illegible]

उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. [illegible] / [illegible] /20 [illegible] वेळ [illegible]
मा. स्थायी समिती / महासभा [illegible]
नोंद रजिस्टर अ. क्र. [illegible]

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०८/२०१४

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक ( ५२ ) :- निविदाना मान्यता देणे.

दि. २५/०५/२०१४ रोजीच्या दै. मिड डे/ दै. नवभारत या वृत्तपत्रात व **e-Tendering** संकेत स्थळ **https://mbmc.eproc.in** मध्ये प्रसिध्द झालेल्या निविदेनूसार सदर कामाकरीता खालीलप्रमाणे ठेकेदारांनी मुदतीत निविदा सादर केल्या आहेत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २१८९४ | मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु. ६९,८६,९६०/- | दि. १६/०८/२०१२ | दै. नवभारत/ दै. मिड ड दि.२५/०५/२०१४ | दि. ०३/०६/२०१४ | दि. २८/०५/२०१४ |

| | | M/s. Shekhar Electricals | M/s. Aditya Electricals | M/s. A.K. Electrical Engg.Co |
|---|---|---|---|---|
| **ITEM CODE** | **DESCRIPTION** | **RATE Per Installation / Per Month** | RATE Per Installation / Per Month | RATE Per Installation / Per Month |
| 1 | Operation and maintenance of street lighting installation having 70W/150W/250W HPSV fixtures and lamps fitted on tubular poles with the Contractor material and manpower. The day to day works include the replacement of HPSV fixtures / fittings , bulbs chokes, igniters accessories related to HPSV fixtures/fittings, contactors, timers (faulty photo switches should be replaced by timers),accessories related to control gear , fuses , wires, PVC cables, bracket clamps, sealing end boxes , control boxes and location and rectification of cable faults replacing entire faulty repairing of non functioning installations, "ON and OFF" of street lights at designated times. The Contractors should be responsible for keeping at least 95 % of the installations in functioning mode by using their materials, manpower. | **299/-** | 349/- | 396/- |

वरील कामाच्या सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता (सावां)
मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-5/13-14/DK/SG/8

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.०२/०८/२०१४

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक :- ( ५५ )** मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव / कामाचा दर | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २३ मधील शास्त्रीनगर येथील हनुमान मंदिर परिसरात गटारे व सी.सी. रस्ते बांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९८,७५०/- | मे.एम.एस. इंटरप्रायझेस | ०.१% कमी दराने |
| २ | मिरारोड (पू.) मुन्शी कम्पाऊंड येथे पोलिस चौकी बनविणे. (नगरसेवक निधी) | रु. ९,९९,८५०/- | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | ०.०५% कमी दराने |
| ३ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. ०७ मधील नित्यानंद धाम ते सुदर्शन अपार्टमेंट येथे सी.सी गटाराचे पुर्नबांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु. ७,१३,०००/- | मे. राठोड ब्रदर्स | ०.१% कमी दराने |
| ४ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २० येथील सुदामानगर पाण्याची टाकी येथे काँक्रीटीकरण व रंगकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु. ६,०९,५५०/- | मे. सुर्या इंटरप्रायझेस | ०.०५% कमी दराने |
| ५ | प्रभाग क्र. २५ मधील चौक भाटी येथे अंतर्गत सी.सी. रस्त्यांचे बांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु. ५,४३,१००/- | मे. श्री.कृपा इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ६ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ०५ मधील संजय अपार्टमेंट ते दळवी चाळ ते स्टार बिल्डींग येथे गटाराचे बांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु. ७,७८,२९०/- | मे. एन.एस. इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ७ | मिरारोड (पू.) शांतीनगर सेक्टर नं. ५ मैदानात कुंपण भिंत बांधणे. (नगरसेवक निधी) | रु. ८,४०,४००/- | मे.श्रीगणेश इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ८ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. १९ मधील रॉयल पॅलेस इमारतीपासून शास्त्रीनगर नं. ३ इमारतीपर्यंत गटाराचे बांधकाम करणे. (नगरसेवक निधी) | रु.५,२४,१००/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ९ | भाईंदर (प.) प्रभाग क्र. २ येथील जय अंबे नगर नं. १ व २ येथे गटर बांधणे व सी.सी. करणे. (नगरसेवक निधी) | रु.९,९९,८५०/- | मे. राठोड असोसिएटस् | अंदाजपत्रकीय दराने |
| १० | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १२, नवघर मराठी शाळा क्र. १३ मधील झेंडा वंदनासाठी शाळेच्या मोकळया जागेत/ मैदानात सी.सी. करुन चेकर्ड लादी लावणे व पत्राशेड बांधणे. (नगरसेवक निधी) | रु. ७,२६,४५०/- | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | ०.०५% कमी दराने |
| ११ | भाईंदर (पू.) प्रभाग क्र. १२ मधील शिवशक्ती नगर येथे संत निरंकारी सत्संग भवन लगत सी.सी. रस्ता बांधणे. (नगरसेवक निधी) | रु. ७,४०,३९०/- | मे. श्री पाटील्स असोसिएटस् | अंदाजपत्रकिय दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | भाईंदर (प.) राव तलाव उद्यानाचे विकास काम करणे. (आमदार निधी) | रु. ९,९९,०००/- | मे.सुर्या इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १३ | भाईंदर (प.) गीतानगर व्यंकटेश पार्क उद्यानात आवश्यक ती कामे करणे. (आमदार निधी) | रु. ९,९९,०००/- | मे. सुर्या इंटरप्रायझेस | ०.०५% कमी दराने |
| १४ | भाईंदर (पू.) आशानगर येथील डांबरीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निधी) | रु. १५,३०,९२०/- | मे.रिध्दीका इंटरप्रायझेस | ०.०५%कमी दराने |
| १५ | प्रभाग क्र. २५ मधील डोंगरी गावातील मुख्य गटार दुरुस्ती करुन गटारावर स्लॅबचे बांधकाम करणे. (महापौर स्वेच्छा निर्णय निधी) | रु. ९,९९,६००/- | मे.विकास इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १६ | मिरारोड (पू.) चंद्रेश ॲकॉर्ड येथील रस्ता डांबरीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निधी) | रु. ८,८८,६००/- | मे. पियुष इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| १७ | भाईंदर (पू.) आशानगर येथील डांबरीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निधी) | रु. १५,३०,९२०/- | मे.रिध्दीका इंटरप्रायझेस | ०.०५ % कमी दराने |
| १८ | प्रभाग क्र. ४७ मधील घोडबंदर गावात स्मशानभुमी रोडवर समाजमंदिर बांधणे. (खासदार निधी) | रू.१८,२१,०००/- | मे. गजानन कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर २.००% कमी दराने |
| १९ | मिरारोड (पू.) उड्डाणपूल जवळील उद्यानात आवश्यक कामे करणे. (आमदार निधी) | रु. १४,९९,०००/- | मे. श्रुती इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर २.००% कमी दराने |
| २० | भाईंदर (पू.) केबिन क्रॉस रोड येथील रस्ता डांबरीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निधी) | रू. २४,९७,८००/- | मे. पियुष इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर २.००% कमी दराने |
| २१ | भाईंदर (प.) २७ येथे सार्वजनिक शौचालय आणि सामाजिक सभागृह बांधणे. (खासदार निधी) | रु.२४,९९,०००/- | मे.श्रीबालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | दरवाटाघाटीनंतर २.००% कमी दराने |
| २२ | मिरारोड (पू.) पुनम सागर मधील जॉगर्स पार्क मध्ये पदपाथ बांधणे. (आमदार निधी) | रु. १४,९९,०००/- | मे.मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| २३ | भाईंदर (प.) वेंकटेश सागर ते देवकीनंदन (वेज सागर गल्ली) पर्यंतच्या रस्ता डांबरीकरण करणे. (महापौर स्वेच्छा निधी) | रु. १३,५८,०००/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | ०.०५% कमी दराने |
| २४ | उत्तन इंदिरानगर येथे कॉंक्रीट रस्ते तयार करणे. (आमदार निधी) | रु. १४,९९,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर ०.५०% कमी दराने |
| २५ | उत्तन लुझारवाडी येथे रस्ता तयार करणे. (आमदार निधी) | रु. १४,९९,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर ०.५०% कमी दराने |
| २६ | उत्तन करईपाडा येथील शौकत बलबले यांच्या घरापासून ते खत्री हाऊस पर्यंत गटार बांधून रस्ता तयार करणे. (आमदार निधी) | रू.१४,९९,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर ०.५०% कमी दराने |
| २७ | उत्तन लुझारवाडी येथे गटार बांधून स्लॅब टाकणे. (आमदार निधी) | रू.१४,९९,०००/- | मे. एस.एम. कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर १.००% कमी दराने |
| २८ | भाईंदर (पूर्व) इंद्रलोक फेस-३ मधील मुख्य रस्त्याची उंची वाढवणे व गटार बांधणे.(विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | ७.७७% कमी दराने |
| २९ | मिरारोड (पूर्व) नवीन गोल्डन नेस्ट मुख्य रस्ता ते गोल्डन इगल इमारती पर्यंत रस्त्याची उंची वाढविणे व डांबरीकरण करणे. (विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | ७.७७ % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | मिरारोड (पू.) येथील निदापार्क व लिगॅसी टॉवर ते साई वृषभ इमारती पर्यंत सी.सी.गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. ५,०४,५७०/- | मे. एकता कंन्स्ट्रक्शन | ८.५% कमी दराने |
| ३१ | प्रभाग क्र. ७४ वरसावे गांव मौजे चेणे येथील स्मशानभुमीचे सुशोभिकरण करणे. (विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे.कंचन कंन्स्ट्रक्शन कं | अंदाजपत्रकीय दराने |
| ३२ | मुर्धागाव मराठी शाळा क्र. २२ ते शंकर मंदिर पर्यंत व भास्कर पाटील यांच्या घरामागील गटार बांधकाम करणे. (दलित वस्ती सुधारणा) | रु. ७,६४,९५०/- | मे. साळुंखे कन्स्ट्रक्शन | ८.७१% कमी दराने |
| ३३ | मिरारोड (पूर्व) रोझवुड टॉवर ते आकाश टॉवर पर्यंत रस्ता व गटार बनविणे. (विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे. साळुंखे कंन्स्ट्रक्शन | ७.७७% कमी दराने |
| ३४ | मिरारोड (पूर्व) पुनमसागर येथल आरक्षण क्र. १९६ मध्ये पाण्याची टाकी, पंपरुम बांधणे व गेट बसविणे. | रु. ५,६५,२००/- | मे. मुस्कान इंटरप्रायझेस | ५.००% कमी दराने |
| ३५ | मिरा-भाईंदर मुख्य रस्ता ते सुंदर नगर अंतर्गत रस्त्याची उंची वाढविणे व चेकर्ड बसविणे. (विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे. आशापुरा कंन्स्ट्रक्शन कं | ७.२% कमी दराने |
| ३६ | मिरारोड (पू.) शांतीनगर सेक्टर ६, इमारत क्र.बी/१ ते बी/७ पर्यंत सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे. | रु. १५,३०,८८०/- | मे.विकास इंटरप्रायझेस | १३.२५ % कमी दराने |
| ३७ | मिरा-भाईंदर मुख्य रोड ते गोल्डन नेस्ट फेस-२ ते ६ समोरील रस्त्याची उंची वाढवणे व गटार बांधणे. (विशेष अनुदान) | रु. १०,००,०००/- | मे. देवी कंन्स्ट्रक्शन | ७.२% कमी दराने |
| ३८ | मिरारोड (पू.) पुनम सागर मधील जॉगर्स पार्क मध्ये पदपाथ बांधणे. (आमदार निधी) | रु. १४,९९,०००/- | मे.मुस्कान इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ३९ | प्रभाग क्र. ११ शिवशक्ती नगर येथील साई श्रध्दा चाळ जवळ २० आसनी शौचालय बांधणे.(विशेष अनुदान) | रु. २०,००,०००/- | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर १.००% कमी दराने |
| ४० | प्रभाग क्र. ०७ आरक्षण क्र. १०८ मधील साईबाबा नगर, अयप्पा मंदिराच्या मागील परीसरात भाजी मार्केट उभारणे. (विशेष अनुदान) | रु. २५,००,०००/- | मे.तुषार इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकीय दराने |
| ४१ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील गॅस गोडाऊन पांचाळ उद्योग येथील गल्लीत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे व रॉयल इस्टेट ते आर.एस.इंड पर्यंत गटार बांधणे. | रु. ६,५५,६०२/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन कं | ०.१%कमी दराने |
| ४२ | प्रभाग क्र. १२ नवघर स्मशानभुमी पुर्नबांधणी व सुशोभिकरण करणे. (विशेष अनुदान) | रु. २०,००,०००/- | मे.कंचन कंन्स्ट्रक्शन कं | दरवाटाघाटीनंतर ३.००% कमी दराने |
| ४३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर, सिल्वर करीता येथील ट्रांझीट कॅम्प मध्ये स्वंतत्र मिटर बसविणे व फिटींग करणे. | रु. ६,६७,८००/- | मे. शेखर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दराने |
| ४४ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. ३०० येथे कम्युनिटी सेंटर बांधणे. (विशेष अनुदान) (तीन मुदतवाढ) | रु. २०,००,०००/- | मे.ऐश्वर्या इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर ८.५% कमी दराने |
| ४५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील मॉर्डन वसाहत जवळील विहीर जवळ गटार बनविणे. (दलित वस्ती निधी) | रु. १०,७५,६००/- | मे. एम.एस. इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर १३.०० % कमी दराने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४६ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४५ मधील माशाचा पाडा जरीमरी तलावा भोवती सुशोभित कुंपण, आसने झाडांची लागवड, ट्री गार्ड बांधणे. (विशेष अनुदान) | रु. १५,००,०००/- | मे.मुस्कान इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर ४.००% कमी दराने |
| ४७ | काशी येथील जरीमरी तलाव, पेणकरपाडा येथील सुकाल तलाव व सातकरी तलावातील दगड तोडणे. | रु. ११,३७,१००/- | मे.ओमकार इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर ५.५०% कमी दराने |
| ४८ | मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ३१ इंद्रलोक फेस ३ मधील आरक्षण क्र. २२१ ला कुंपण भिंत बांधणे. (विशेष अनुदान) | रु. २५,००,०००/- | मे.मुस्कान इंटरप्रायझेस | ५.२५% कमी दराने |
| ४९ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४६ ओवळा माजीवडा मतदार संघातील रस्त्याची बाजूची गटारे बनविणे. (विशेष अनुदान) (तीन मुदतवाढी) | रु. २५,००,०००/- | मे.साळुखे कंन्स्ट्रक्शन | दरवाटाघाटीनंतर १०.००% कमी दराने |
| ५० | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १४६ ओवळा माजीवडा मतदार संघातील रस्ते विकास करणे. (विशेष अनुदान) | रु. २५,००,०००/- | मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | दरवाटाघाटीनंतर ५.००%कमी दराची |

वरील कामांच्या निविदांना मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहेत.

कार्यकारी अभियंता (सा.बां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

नगरसचिव विभाग.